गुरुवार, ०१ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१०९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 01 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-109 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# कोविड काळात काम केलेल्या परिचारिकांना गिफ्ट

## राज्य सरकारचा निर्णय : आरोग्य विभागाच्या सेवेत कायम करणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : कोविड काळात कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या परिचारिकांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. ५९७ परिचारिकांची कायमस्वरुपी शासकीय सेवेत नियुक्ती होणार आहे. आरोग्य विभागाने हा मोठा निर्णय घेतला आहे.**



कोविडच्या काळात आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आल्याने मोठ्या प्रमाणावर परिचारिकांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्यात आली होती. यांपैकी ५९७ परिचारिकांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या परिचारिकांना कोविड काळात ११ महिन्यांच्या कंत्राटी कामावर घेण्यात आले होते. पण कोविडचा संसर्ग कमी झाल्यानंतर त्यांचा करार पुन्हा वाढवण्यात आला होता. पण यानंतर त्यांना सेवेतून पायउतार व्हावे लागणार होते. या परिचारिकांनी अनेकदा मागणी देखील केली होती की आम्हाला कायमस्वरुपी सामावून घ्या. जीवाची बाजी लावून या परिचारिकांनी कोविडच्या काळात लोकांची सेवा केल्याने केंद्राची परवानगी घेत राज्य शासनाने या परिचारिकांना राज्य शासनाच्या सेवेत कायम करण्याचा निर्णय घेतला.

महत्वाची बातमी

## बिल्किस बानोंची सर्वोच्च न्यायालयात धाव



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सामूहिक बलात्कार प्रकरणातील दोषींच्या शिक्षा माफीविरोधात बिल्किस बानो यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. २००२ गुजरात दंगलींदरम्यान बिल्किस बानो यांच्यावर सामूहिक बलात्कार करणाऱ्या आणि त्यांच्या कुटुंबियांची हत्या करणाऱ्या ११ दोषींना गुजरात सरकारने काही महिन्यांपूर्वी मुक्त केले आहे. १९९२ मधील शिक्षा माफीचे नियम या प्रकरणात लागू करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून गुजरात सरकारला देण्यात आलेल्या परवानगीला बिल्किस बानो यांनी आव्हान दिलं आहे. ११ दोषींच्या सुटकेला आव्हान देणारी रिट याचिकाही त्यांनी दाखल केली आहे. गुजरातमधील गोध्रा रेल्वे जळीतकांडानंतर उसळलेल्या दंगलीतून पळून जात असताना बिल्किस बानो यांच्यावर सामूहिक बलात्कार झाला होता. तेव्हा २१ वर्षीय बिल्किस पाच महिन्यांच्या गर्भवती होत्या. डोळ्यांदेखत त्यांच्या तीन वर्षीय मुलीसह कुटुंबातील सात जणांची दंगलखोरांनी हत्या केली होती. गुजरात सरकारच्या शिक्षा माफी धोरणाद्वारे या प्रकरणातील ११ दोषींची गोध्रा-उप कारागृहातून १५ ऑगस्टला मुक्तता करण्यात आली आहे. हे दोषी जवळपास १५ वर्ष तुरुंगात कैद होते. दरम्यान, सरन्यायाधीश डी. वाय.चंद्रचूड यांच्यासमोर आज बानो यांनी दाखल केलेल्या याचिकांचा उल्लेख करण्यात आला. दोन्ही याचिका एकत्र ऐकल्या जाऊ शकतात का किंवा त्याच खंडपीठासमोर त्यांची सुनावणी होऊ शकते, यावर परीक्षण केले जाईल, असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे.

## 'क्षत्रिय कुलावतंस, राजाधिराज....'



छत्रपतींची मूर्ती असलेल्या या पालखीची मिरवणूक प्रतपगडावर काढण्यात आली. शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याजवळ पालखीचे आगमन झाल्यावर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पुष्प अर्पण करुन भक्तिभावे पूजन करण्यात आले. यावेळी 'क्षत्रिय कुलावतंस, राजाधिराज', या ललकारींने, शिवरायांच्या जयजयकाराच्या घोषणांनी वातावरण भारुन गेले होते.

चर्चेतील बातमी

## भाजपा आ. सुरेश धस यांच्यासह पत्नी आणि भावावर गुन्हा दाखल



आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** हिंदू देवस्थान जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण केल्याप्रकरणी भाजपा आमदार सुरेश धस यांच्यासह त्यांची पत्नी प्राजक्ता धस, भाऊ देविदास धस, मनोज रत्नपारखी, अस्लम नवाब खान यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. बीड जिल्ह्यातील हिंदू देवस्थान जमीन घोटाळा प्रकरणात गुन्हे दाखल करून चौकशी करावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते राम खाडे पाठपुरावा करत आहेत. याबाबत खाडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. यानंतर न्यायालयाने १८ ऑक्टोबर रोजी राम खाडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्याचे आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिले होते. खाडे यांनी आपल्या तक्रारीत आमदार सुरेश धस यांचं नाव घेतल्याने त्यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवला आणि सुरेश धस यांची याचिका फेटाळली. त्यानंतर औरंगाबाद खंडपीठाने तक्रारदार राम खाडे यांची १३ जानेवारी २०२२ रोजी दाखल करण्यात आलेली तक्रार ग्राह्य समजून गुन्हा दाखल करण्याचे आदेशदिले. त्यानुसार २९ नोव्हेंबर रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे करत आहेत.


# ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ लालूजीराव कोत्तापल्ले (वय ७४ ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

साठोत्तरी कालखंडात कविता, कथा, दीर्घकथा, कादंबरी, ललित गद्य आणि समीक्षा अशा विविध वाङ्मयप्रकारांत दर्जेदार वाङ्मयनिर्मिती करणारे नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) या गावी झाला. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बी.ए. आणि एम.ए. या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. ते कुलपतींच्या सुवर्णपदकाने सन्मानित झाले होते. 'शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएच.डी. पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात १९७१ ते १९७७ या काळात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये त्यांनी अधिव्याख्याता आणि प्रपाठक या पदांवर १९७७ ते १९९६ या काळात काम केले.

१९९६ ते २००५ या कालावधीत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक आणि विभाग प्रमुख म्हणून काम केले. २००५ सालापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर



मराठवाडा विद्यापीठाचे ते कुलगुरू झाले. व्यासंगी, अध्यापनकुशल, उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक आणि पुणे विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक या पदांवरून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था आणि साहित्य अकादमी या संस्थांच्या विविध समित्यांचे सदस्य म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार समितीचे अध्यक्ष (१९८८-१९८९), महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि विविध विद्यापीठांच्या मराठी अभ्यास मंडळांचे ते सदस्य होते. मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. राज्य शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे ते अध्यक्ष होते.

कोत्तापल्लेंनी कविता, कथा, कादंबरी, समीक्षण असे सर्व साहित्य प्रकार हाताळले.


मूड्स, दरोबस्त लिंपून घ्यावा मेंदू हे त्यांचे कविता संग्रह आहेत. कर्फ्यू आणि इतर कथा, रक्त आणि पाऊस, संदर्भ, कवीची गोष्ट, सावित्रीचा निर्णय, काळोखाचे पडघम, देवाचे डोळे, राजधानी हे त्यांचे कथासंग्रह आहेत. गांधारीचे डोळे, अस्तित्वाची शुभ्र शिडे या त्यांच्या कादंबऱ्या आहेत.

**साहित्य क्षेत्राची अपरिमित हानी :मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी कोत्तापल्ले यांना आदरांजली वाहिली आहे . ते म्हणाले, ज्येष्ठ साहित्यिक तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील सहकारी सदस्य डॉ . नागनाथ कोत्तापल्ले यांचे निधन झाले आहे . त्यांच्या जाण्याने मराठी साहित्य क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले .

**अतिशय दुखद घटना :उपमुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ . कोत्तापल्लेंना श्रद्धांजली वाहिली आहे . फडणवीस म्हणतात की "ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ . नागनाथ कोतापल्ले यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दु :खद आहे . कथा, कविता, दीर्घकथा, कादंबरी, ललित, अनुवाद, समीक्षा अशा विविधांगी प्रकारांतून त्यांनी विपुल साहित्यसेवा केली .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी

एका ठिकाणी म्हटले आहे, ' Someetimes try to calculate the index of your gratitude and then you wil realise how lucky you are ! ' आपण खरंच हा निर्देशांक मोजायची सवय लावली तर आपल्याला कळून येईल की आपण खरेच किती भाग्यवान आहोत. पण आपण नेहमी इतरांशी नको त्या गोष्टींची तुलना करून हा सहज मिळणारा आनंदही गमावून बसतो. आपल्याला स्वतःबद्दल किती घमेंड असते पण साधे श्वास घेणे सुद्धा आपल्या हातात नसते. श्वास चालू आहेत ते त्याच्या कृपेने. केव्हा थांबतील याचा भरोसा नाही. जेव्हा श्वास घ्यायला त्रास होतो आणि दवाखान्यात भरती केले जाते तेव्हा आपल्याला श्वासांची किंमत कळते. एखाद्या अंध व्यक्तीच्या आयुष्याशी आपली तुलना केल्यावर डोळ्यांची किंमत कळते. मग आपल्याला मिळालेले हे अख्खे शरीर त्या विधात्याने दिले हे त्याचे केवढे मोठे उपकार ! त्याचे मोल तरी करता येईल का ? पण



त्याबद्दल आपण त्याचे किती वेळा धन्यवाद व्यक्त करतो ?
आपल्याला मिळालेले मित्र, नातेवाईक आपल्याशी असलेल्या कुठल्यातरी ऋणानुबंधाने आपल्याला मिळालेले असतात. त्यांच्यामुळे आपले जीवन सुकर झालेले असते. मित्र आणि नातेवाईक एवढेच नव्हे तर आपल्याला त्रास देणारे हितशत्रू, आपली कठीण काळी परीक्षा घेणारी संकटे या सगळ्या गोष्टी आपल्याला काहीतरी शिकवून जातात म्हणून यांच्याबद्दलही आपल्या मानत कृतज्ञतेची भावना असायला हवी. लहानपणापासून आजपर्यंत आपल्याला कोणी कोणी मदत केली याची जर आपण यादी करायला बसलो तर तर ही यादी खूप मोठी होईल. आता थोडेसे दुसऱ्या यादीकडेही वळू. ती म्हणजे आपण कोणाकोणाला किती उपयोगी पडलो, कोणाच्या आयुष्यात आपल्यामुळे आनंद, सुख आले ? अवघड वाटते ना ? ही यादी फार काही वाढत नाही असे दिसते. ही यादी जेव्हा पहिल्या यादीपेक्षा अधिक मोठी होईल, तेव्हा आयुष्याच्या मार्गावर आपली वाटचाल योग्य दिशेने सुरु आहे असे म्हणता येईल. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### दातृत्वाचे महत्व समजून घ्यावे

आधुनिक केसरी

आपल्या जन्मापासूनच आपलं स्वतंत्र अस्तित्व निर्माण झालेलं असतं. आपलं स्वतःचं आयुष्य प्रत्येकजण आपापल्या पिंडानुसार व्यतीत करत असतो. आपल्या आवडी-निवडी, विचार-आचार, उठणं-बसणं, चालणं-बोलणं, हसणं-रुसणं हे सर्व काही इतरांपेक्षा नेहमीच भिन्न असतं. हे सर्व भिन्न असण्याचं सर्वात महत्वाचं कारण म्हणजे निसर्गानं आपल्याला दिलेला भिन्नतेचा अधिकार. प्रत्येकाचा पिंड निराळा असतो, जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. आपलं स्वातंत्र्य अबाधित राहण्यामागे आपल्या अधिकाराची जाणीवच कार्यरत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या वक्तृत्वामुळे, नेतृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे प्रत्येकाची ओळख होत असते. काही जणांची ओळख त्यांच्या दातृत्वामुळे, मातृत्वामुळे किंवा पितृत्वामुळे होत असते. यांपैकी आपलं व्यक्तिमत्व कोणत्याही कारणांमुळे स्वतंत्र अस्तित्व बनवत असलं तरीही त्या व्यक्तिमत्वाची नाळ कशा-ना-कशाशीतरी म्हणजेच नैसर्गिकरीत्या प्राप्त झालेल्या आपापल्या अधिकारांशी जोडलेली असते. व्यक्ती म्हणून कितीही स्वतंत्र अस्तित्व असलं तरीही शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक पातळीवर कोणतीही व्यक्ती एकट्याने जीवन आनंदी करू शकतेच असं नाही. प्रत्येकाला कोणाची का होईना पण साथ, सोबत, संगत हवी असतेच. शरीरानं जसं फार काळ कोणी एकटं राहू शकत नाही, तसंच मनानं देखील एकलेपण अधिक काळ सुखावह ठरत नाही. एकलेपणाची अनुभूती घेणारं आपलं मनच मग प्राप्त असलेल्या अधिकाराच्या जाणीवेनं कृतीशील होऊ लागतं. नैसर्गिकरीत्या मिळालेल्या अधिकाराचा वापर करणं हे जितकं स्वाभाविक असतं तितकंच त्या अधिकारांची कर्तव्य म्हणून जाणीव होणं देखील जरुरीचं असतं. अनेकदा कर्तव्यदक्ष म्हणवणारी व्यक्तीच प्राप्त अधिकाराचं महत्व समजू शकत नाही आणि त्याचा वापर करत नाही तेव्हा त्या व्यक्तीमधील उणिवांचं दर्शन होऊ लागतं.



आधुनिक केसरी

### म्हणूनी वारीचा | पाईक मी ||

यातनाचे भय |आम्हा काय वाटे ||
यत्नाचे दीवटे | आम्हा हाती ||१||
कठोर साधना | आम्हा ठायी वसे ||
तया कैसे पीसे | लागे सांगा ? ||२||
नको मना अती | करू रे विचार ||
अंगी सदाचार | जागा ठेवी ||३||
हरिनामा संगे | झाली सोयरिक ||
म्हणूनी सोशिक | देह झाला ||४||
सारा भार साहे | विठ्ठल आमुचा ||
म्हणूनी वारीचा | पाईक मी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी

### माय सरस्वती


मूर्ती साजिरी गोजिरी। हास्य प्रसन्न निर्मल।
माय बसे हंसावरी। आसनी श्वेत कमल।।
हंसारूढ सरस्वती। ग्रंथजपमाळ हाती।
सत्वप्रधाना मूरती। माय ब्रह्मविद्या देती।।
मयूरवाहना शारदा। वीणा शोभे अंकावरी।
सर्वकलांची देवता। भक्ते यशवर्षा करी।।
चंद्रहास मुका बाल। कृपा करे सरस्वती।
चंद्रहास गं वाचाल। माय वसे रसवन्ती।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## काव्य-चरितावली

### पुष्प -तिसरे



आधुनिक केसरी

श्रीमहाराजांचे वडील रावजी
ना केली लबाडी, ना फसवेगिरी
बाह्यस्वरूपी अबोल स्वभावाचे
अंतरी अखंड स्मरण पांडुरंगाचे ।। १ ।।

श्रीमहाराजांच्या मातोश्री गीताबाई जबाबदारी
सारी स्वीकारे सुनबाई
व्यावहारिक भार संसाराचा वाही
"गीतामाय "आल्या गेल्याचे पाही ।।२ ।।

रावजी-गीताबाईस सत्पुरुष भेटे
श्रीफल प्रसादाने मन संतोषले
यथावकाश डोहाळे सुरू झाले
गीतामायचे अखंड रामनाम चाले ।। ३ ।।

काव्यचरित लेखने आनंद होई
कवी अरुणदास भावुक होई
।। जय श्रीराम ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

भारतीय तत्त्वज्ञानानुसार मानवी जन्मच मुळी दुःखमय आहे, आणि म्हणून जन्मापासून सुटका हा दुःखनाशाचा खरा आणि एकमेव उपाय आहे. यावर कोणी म्हणेल की मग तो उपाय मृत्यू हा आहे. पण तसे मानणे चूक होईल, कारण मृत्यूनंतर पुनर्जन्म यांचा पुरावा म्हणून जो युक्तिवाद करण्यात येतो तो कर्मसिद्धांताच्या आधाराने. कर्मसिद्धांताचे प्रतिपादन असे आहे की मनुष्याला आपल्या कर्मांची फळे चाखावीच लागतात, एवढेच नव्हे तर त्याला येणारे सर्व सुखदुःखात्मक अनुभव त्याच्या स्वतःच्याच कृतकर्मांची, त्याने स्वतः अर्जित केलेली फळे असतात. या सिद्धांताचे पूर्वजन्म आणि पुनर्जन्म हे उपसिद्धांत आहेत. पुनर्जन्म मानावा लागतो कारण नाहीतर ‘कृतस्य हानम्’ (म्हणजे कृतकर्मांचा नाश किंवा कृतकर्मे निष्फळ होणे) हा दोष पदरी येतो, कारण आपल्या कित्येक सत्कर्मांची मधुर फळे आणि दुष्कर्मांची कटू फळे आपल्याला या जन्मात मिळताना दिसत नाहीत. आणि पूर्वजन्म मानावा लागतो, कारण नाही तर ‘अकृतस्य अभ्यागमः’ (म्हणजे न अर्जिलेली फळे चाखणे) हा दोष स्वीकारावा लागतो. कारण कर्मे करू लागण्यापूर्वीच जन्मतःच जी सुखदुःखे आपण अनुभवतो ती या जन्मात केलेल्या कर्मांची फळे अर्थात नसतात. याप्रमाणे पूर्वजन्म व पुनर्जन्म जर अटळ असतील तर त्यातून जन्मांची एक अनादी आणि अनंत परंपरा निष्पन्न होते. पण हे खरे असेल, आणि जन्म



म्हणजे दुःख हेही खरे असेल तर अनंत काळपर्यंत दुःखयोग हेच जीवाचे भविष्य दिसते. मग यातून सुटका कशी होणार ? यावर भारतीय तत्त्वज्ञांचे उत्तर आहे, ज्ञानाने आत्मज्ञानाने. पण हे म्हणणे चमत्कारिक दिसते. कारण केवळ ज्ञानाने कोणतेही बंधन नाहीसे होत नाही. ज्ञानाने एखादे बंधन नाहीसे करण्याचा उपाय कोणता ते कळेल; पण त्या उपायाचा अवलंब करावाच लागेल, म्हणजे ज्ञान मिळाल्यावर काही तरी कर्म करावे लागेल. पण आपले बंधनच जर सामान्य बंधनाहून वेगळे असले तर? आणि ते तसे आहे असे भारतीय तत्त्वज्ञांचे म्हणणे आहे. आपले जे बंधन आहे-म्हणजे जन्ममृत्यूला संसार-ते अज्ञानजन्य, भ्रामक आहे असे ते प्रतिपादतात. खरे स्वरूप सुखरूप किंवा मुक्त असेच वस्तुतः आहे. म्हणून वस्तुतः आपण बद्ध, पीडित नसतोच. आत्मस्वरूपाविषयीच्या अज्ञानाने, अविवेकाने आपल्याला तसा भ्रम झालेला असतो. आणि भ्रम घालविण्याकरिता ज्ञान अगदी पुरे असते. पाश्चात्य तत्त्वज्ञान श्रुतींचा (म्हणजे शब्दप्रमाणाचा) आधार न घेता केवळ तर्काने, युक्तिवादाने आपल्या सिद्धांतांची प्रस्थापना करते. निदान तशी त्याची प्रतिज्ञा आणि प्रयत्नही असतो, असे वर म्हटले आहे. असे जरी असले तरी त्याचीही मूलप्रेरणा तत्त्वतः भारतीय अध्यात्माच्या मूलप्रेरणेसारखीच आहे. ही प्रेरणा म्हणजे या अफाट विश्वातील मानवाची असहायता, एकाकीपणा, त्याचे अपघातात्मक अस्तित्व, आणि एकूणच अनिश्चित भवितव्य यांतून निर्माण झालेली विश्वाचे खरे स्वरूप शोधण्याची जिज्ञासा. या जिज्ञासेतून तत्त्वज्ञान उद्‌भवले. परंतु ती जिज्ञासा शुद्ध, निरपेक्ष जिज्ञासा नाही. विश्वाचे स्वरूप बाह्यतः किंवा सकृद्दर्शनी जरी मानवाला प्रतिकूल आहे असे दिसले तरी वस्तुतः ते त्याला अनुकूल आहे असेच उत्तर या जिज्ञासेला हवे आहे. आणि बहुतेक तत्त्वज्ञाने याच इच्छेने प्रभावित झालेली आहेत. विज्ञानाने उभे केलेले विश्वाचे आणि त्यातील मनुष्याच्या शून्यप्राय स्थानाचे चित्र पूर्णतः किंवा वस्तुतः खरे नव्हे असे दाखविण्याकरिता प्रामुख्याने तत्त्वज्ञानाचा अवलंब केला जातो, आणि त्यातून मानवाला दिलासा देणारी, त्याचे माहात्म्य प्रतिपादणारी तत्त्वज्ञाने उद्‌भवली आहेत. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणेच पाश्चात्य तत्त्वज्ञानही प्रामुख्याने मानवकेंद्रित, मानवेच्छापूरक स्वरूपाचे झालेले आहे.
फरक एवढाच आहे की त्यात सर्व गोष्टी युक्तिवादाने सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे. कोणती गोष्ट केवळ श्रुतिप्रणीत म्हणून स्वीकारण्याचे टाळण्याचा त्याचा प्रयत्न आहे.
अध्यात्मवादी तत्त्वज्ञानात वापरल्या जाणाऱ्या ज्या तीन पद्धती आहेत, म्हणजे शब्द, साक्षात्कार आणि युक्तिवाद, त्यांच्याविषयी थोडे लिहिणे उचित होईल. शब्द आणि साक्षात्कार या दोन ज्ञानसाधनांच्या प्रामाण्यविषयी काय लिहावे? एका शब्दात सांगायचे तर त्यांच्या समर्थनार्थ काहीही सांगता येण्यासारखे नाही. लौकिक शब्द (उदा. वैज्ञानिकाचे शब्द) आपण प्रमाण म्हणून स्वीकारतो हे खरे. पण त्यांचे प्रामाण्य स्वतंत्र नाही; ते इंद्रियानुभव आणि अनुमान या अन्य ज्ञानसाधनांवर अवलंबून असते हे आपण पाहिले. पण शब्दाचे किंवा श्रुतीचे प्रामाण्य मात्र तिचे स्वतःचे, स्वतंत्र असते असे प्रतिपादले जाते. निदान त्याला अन्य कोणत्याही प्रमाणाचा आधार दिला जात नाही. ते प्रमाण अन्य सर्व प्रमाणांच्या वरचे, त्यांहून श्रेष्ठ आहे असे मानले जाते. एवढेच नव्हे तर अंतिम सताचे ज्ञान देणारे त्याच्याखेरीज अन्य प्रमाण नाही असे प्रतिपादले जाते. पण हे खरे मानण्याला कसलेही कारण दिसत नाही. शब्दप्रमाण अतिभौतिकीय, अतींद्रिय अशा गोष्टींबद्दल माहिती देत असल्यामुळे ती माहिती खरी आहे की नाही हे पडताळून पाहण्याचे कोणतेही साधन आपल्याजवळ नाही. परंतु श्रुती प्रमाण मानण्याला बाधक अशा दोन गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. **क्रमशः**

दि. य. देशपांडे

# नाशिक जिल्हा बँकेत एकरकमी कर्जफेड योजना राबवा

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडेवाकद :** नाशिक जिल्हा बँकेच्या समस्यांसंदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटना अध्यक्ष मा. राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांची मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांचे सोबत बैठक संपन्न झाली.

नाशिक जिल्हा बँकेत साधारण ६२ हजार शेतकऱ्यांचे १४०० कोटी रुपये थकीत असून या शेतकऱ्यांचे सर्व व्यवहार बँकेने बंद केले आहे. अनेक शेतकऱ्यांवर बँक जप्तीची कारवाई करत आहे. मात्र हे शेतकऱ्यांमुळे नाही तर सरकारचे चुकीचे धोरण, नोटबंदी, बँकेचे चुकीचे व्याज दर यामुळे थकीत झाले आहे ही बाब राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. शेतकऱ्यांना बँकेच्या पाशवी कर्जातून मुक्त करायचे असेल तर राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे एकरकमी कर्जफेड योजना राबवण्याचा तत्काळ आदेश जिल्हा बँकेला द्यावा किंवा या बँकेला स्वतंत्रपणे आर्थिक पॅकेज जाहीर करावे अशी मागणी यावेळेस राजू शेट्टी, संदीप जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली. या मागणीला नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी देखील दुजारा देत आम्ही याबाबत सकारात्मक निर्णय घेऊ असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.



नाशिक जिल्हा बँकेने पाशवी पद्धतीने कर्जवसुलीची कारवाई सुरू केली आहे . शेतकऱ्यांच्या जमिनीचे लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली आहे . मागील काही दिवसांमध्ये नाशिक जिल्ह्यात द्राक्षे, भाजीपाला या पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला नाही . त्यातच बँकेने नियमबाह्य व्याज लावले . यामुळे मुद्दलापेक्षा अनेक पटीने व्याज वाढले आहे . जे शेतकऱ्यांच्या भरण्याच्या क्षमतेबाहेर आहे . त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे .

**संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

# मेट्रोच्या भुर्दंडाचे दहा हजार कोटी ठाकरेंकडून वसूल करा

## भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांच्या बालिश हट्टामुळेच मेट्रो कारशेडचे काम रखडल्यामुळे मुंबईकरांवर दहा हजार कोटींचा वाढीव बोजा पडल्याचे स्पष्ट झाले आहे. हा मुंबईद्रोह असून राज्याबद्दल उद्योगक्षेत्रात संशयाचे वातावरण तयार करून आता महाराष्ट्र द्रोह केला जात आहे, असा थेट आरोप प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी बुंधवारी केला. मेट्रोचे काम रखडवल्याबद्दल उद्धव व आदित्य या ठाकरे पितापुत्रांकडून दहा हजार कोटी वसूल करा, अशी मागणीही उपाध्ये यांनी यावेळी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश प्रवक्ते अतुल शाह यावेळी उपस्थित होते.

मेट्रो प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा कोणताही अभ्यास नसताना आणि कारशेड आरेमध्येच उभारणे योग्य असल्याचा अहवाल जाणीवपूर्वक दाबून ठेवून कारशेडच्या कामास स्थगिती देताना, मुंबईकरांना सुविधांपासून वंचित ठेवण्याचाच ठाकरे पितापुत्रांचा कट होता का, अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली. मेट्रो कारशेड आरेमध्येच उभारावी, असा स्पष्ट अहवाल मनोज सौनिक समितीने २०२० मध्येच ठाकरे सरकारला दिला होता. आता सर्वोच्च न्यायालयानेही आरेमध्ये मेट्रो कारशेड उभारण्यास हिरवा कंदिल दाखविल्याने ठाकरे यांच्या हट्टाचे पितळ उघडे पडले आहे. वेदान्ता-फॉक्सकॉन प्रकल्पाविषयीची वस्तुस्थिती याआधीच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली आहे. घरातून सत्ता राबविण्याच्या उद्धव ठाकरेंच्या हट्टामुळेच महाराष्ट्रातून अनेक प्रकल्पांनी काढता पाय घेतल्याचे वारंवार स्पष्ट होऊनही ही जबाबदारी ढकलून महाराष्ट्राची दिशाभूल करण्याचा आदित्य ठाकरेंचा प्रयत्न केविलवाणा आहे, असा टोला उपाध्ये यांनी मारला. आदित्य ठाकरे यांनी दाखवलेली कागदपत्रे फॉक्सकॉन महाराष्ट्रातून जाऊ नये यासाठी शिंदे - फडणवीस सरकारने केलेल्या प्रयत्नांची साक्ष देणारी आहेत. हा प्रकल्प महाराष्ट्रात व्हावा यासाठी उद्धव ठाकरे सरकारने केलेल्या प्रयत्नांचा पुरावा म्हणून आदित्य ठाकरे यांनी एक कागद तरी दाखवावा, असे आव्हानही उपाध्ये यांनी दिले.

# डॉ. दीपाली बेले यांची एम.डी. (त्वचारोगतज्ञ) साठी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** येथील सुप्रसिद्ध लेखिका व कवयित्री छाया बेले व पोलीस निरीक्षक अशोक बेले यांची कन्या डॉ. दीपाली बेले यांची मध्य प्रदेशातील रिवा येथील शाम शाह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात त्वचारोग विषयातील पदव्युत्तर शिक्षण एम. डी. साठी निवड झाली आहे.

डॉ. दीपाली बेले यांचे एम.बी.बी.एस.पदवी पर्यंतचे शिक्षण मिरज जि. सांगली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे झाले असून रिवा सारख्या नामांकित कॉलेज मध्ये मिळालेल्या प्रवेशाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

त्यांच्या यशाचे श्रेय त्यांनी आपली आई साहित्यिक छाया बेले, वडील अशोक बेले, बहीण सोनाली व कुटुंबियांना दिले आहे. समाजातील गरीब व गरजू लोकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा त्यांचा मानस आहे.तसेच मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करण्यासाठी व स्त्रीशिक्षण व सक्षमीकरणासाठी कार्य करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी जिद्द चिकाटीने कष्ट करून हे यश मिळावल्याचे त्यांच्या आईने सांगितले,तसेच त्यांच्या मेहनत, जिद्द व चिकाटीने त्यांना यश मिळाले आहे असे त्या म्हणाल्या.

# स्त्रियांच्या हिंसामुक्त जगण्याच्या, लैंगिक व प्रजनन हक्काची मांडणी होणे आवश्यक

## सम्यक इंडियाचे कार्यकारी संचालक आनंद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महिला हिंसाचार विरोधी जागतिक पंधरवडा निमित्त स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान, लैंगिक व प्रजनन आरोग्य, स्त्रियांवर होणारी हिंसा या विषयी मराठवाड्यातील सहा जिल्ह्यातील प्रमुख संस्था व संघटनांचे चर्चा सत्र मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी येथे पुण्यातील सम्यक इंडिया यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसीय चर्चा सत्राच्या उद्घाटन कार्यक्रमात संस्थेचे कार्यकारी संचालक आनंद पवार यांनी मानवाधिकार व समाजातील स्त्रियांची स्थिती यावर मांडणी केली. मानवाधिकारांची चर्चा सर्वव्यापक होण्याची व त्या अंतर्गत स्त्रियांच्या हिंसामुक्त जगण्याच्या व लैंगिक व प्रजनन हक्काची मांडणी होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. चर्चा सत्रामध्ये स्त्रियांच्या कायदेशीर व सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्यावर सम्यक इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक व स्त्रियांच्या आरोग्य विषयक अभ्यासक प्रीतम पोतदार




यांनी मांडणी केली. या वेळी चर्चा सत्रामध्ये मराठवाडयातील औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी या जिल्हयातील स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्यांची मांडणी सहभागी अभ्यासकांनी केली. आर्थिकदृष्ट्या सधन असलेल्या स्त्रियांना गर्भपाताच्या सेवा खासगी डॉक्टरांकडे मिळतात मात्र गरीब, वंचित, शेतकरी, कष्टकरी स्त्रियांना मात्र कायद्याच्या चौकटीत बसत असतानाही गर्भपाताच्या सेवा न मिळाल्यामुळे असुरक्षित गर्भपाताचा मार्ग अवलंबवावा लागतो अशी मांडणी अभ्यासकांनी केली. याशिवाय सुरक्षित गर्भपाताच्या सेवा गुन्हा मुक्त करण्याची मागणी चर्चासत्रातून पुढे आली. स्त्रियांच्या लैंगिक व प्रजनन हक्कांच्या भाषेचे संवर्धन माध्यमप्रतिनिधी करू शकतात व त्यासाठी मराठवाडा विभागीय पातळीवरती पत्रकारांचे अधिवेशन घेतले जावे असे मत आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे व ज्येष्ठ पत्रकार शांताराम मगर यांनी व्यक्त केले. डिसेंबर महिन्यात असे अधिवेशन सम्यक इंडिया व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई, औरंगाबाद विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात यावे असा प्रस्ताव या चर्चा सत्रात मांडण्यात आला. हे चर्चा सत्र यशस्वी होण्याकरिता सम्यक इंडिया च्या प्रकल्प संचालक गौरी कुलकर्णी, राधाकृष्ण सोनवणे, प्रकल्प समन्वयक ज्योत्स्ना सोनकुसरे व मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी श्रीयुत मेटे यांचे सहकार्य लाभले.

# पद्मभूषण विजेते चिरंजीवी यांना भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या (IFFI) 53 वा '2022 पुरस्कार' टॉलीवूड प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** टॉलीवूड मेगास्टार आणि पद्मभूषण पुरस्कार विजेते श्री कोनिडेला शिव शंकर वारा प्रसाद, ज्यांना चिरंजीवी म्हणून ओळखले जाते, त्यांना गोव्यात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या (IFFI) 53 व्या आवृत्तीच्या समारोप समारंभात '2022 पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

या सन्मानाबद्दल इफ्फी, भारत सरकार आणि पंतप्रधान यांचे आभार मानण्याव्यतिरिक्त, चिरंजीवीने त्याचे पालक आणि तेलुगू चित्रपट उद्योगाचे आभार देखील व्यक्त केले. तो म्हणाला, "मी माझ्या आई-वडिलांचा सदैव ऋणी राहीन ज्यांनी मला कोनिडेला शिव शंकर वरा प्रसाद म्हणून जन्म दिला आणि तेलुगू फिल्म इंडस्ट्रीचाही ज्याने मला चिरंजीवी म्हणून जन्म दिला. या उद्योगाचा मी आयुष्यभर ऋणी आहे.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार स्वीकारताना चिरंजीवी यांनी राजकारणातून परतल्यानंतरही त्यांचा स्वीकार केल्याबद्दल त्यांच्या चाहत्यांचे मनापासून आभार मानले. सुप्रसिद्ध अभिनेता म्हणाला, 'माझ्यावर जे प्रेम आणि आपुलकीचा वर्षाव झाला आहे तो खूप मोठा आहे. मी 45 वर्षांहून अधिक काळ या उद्योगात आहे, त्यापैकी एक दशक मी राजकारणात घालवले. जेव्हा मी चित्रपटसृष्टीत परत आलो तेव्हा लोक मला कसे स्वीकारतील याबद्दल मला शंका होती. पण माझ्या चाहत्यांकडून मला मिळणारे प्रेम आणि आपुलकी कधीच बदललेली नाही. माझे अस्तित्व त्यांच्या हृदयात अबाधित होते. मी वचन देतो की मी तुला पुन्हा कधीही सोडणार नाही, मी येथे तुझ्याबरोबर असेन.

पुरस्कार मिळाल्यानंतर मिळालेल्या पाठिंब्याबद्दल आणि आजीवन अनुभवाबद्दल चिरंजीवीने सरकार आणि चित्रपट उद्योगाचे आभार व्यक्त केले. तो म्हणाला, "मी माझे डोके टेकवून तुम्हा प्रत्येकाचे आभार मानतो. जर कोणाला सिनेसृष्टीत येण्याची इच्छा असेल तर नक्की या. हा भ्रष्टाचारमुक्त व्यवसाय आहे. तुमच्या सद्सद्विवेक बुद्धीला कधीच अपराधीपणा वाटणार नाही. तुमच्यात टॅलेंट असेल तर तुम्ही ते इथे दाखवू शकता आणि तुम्ही गगनाला भिडलात. चार दशकांहून अधिक काळ गाजवलेल्या चित्रपट कारकिर्दीत, चिरंजीवीने तेलुगूमधील 150 हून अधिक वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांमध्ये तसेच हिंदी, तमिळ आणि कन्नडमधील काही चित्रपटांमध्ये काम केले आहे.



# झोम्बी व्हायरस

आधुनिक केसरी

रशियामधील एका संशोधनादरम्यान फ्रेंच वैज्ञानिकांना ४८ हजार वर्षांपूर्वीचा एक विषाणू सापडला आहे. रशियामधील एका गोठलेल्या तळ्यामध्ये हा विषाणू सापडला असल्याची माहिती समोर आली आहे. 'न्यू यॉर्क पोस्ट'च्या हवाल्याने एएनआय या वृत्तसंस्थेनं दिलेल्या वृत्तानुसार या विषाणूला 'झोम्बी व्हायरस' असं म्हटलं आहे. या विषाणूमुळे पुन्हा एकदा करोनापेक्षाही अधिक भयंकर आणि मोठी साथ पसरण्याची भीतीही या वैज्ञानिकांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेतील न्यू यॉर्क शहरामधून प्रकाशित होणाऱ्या या वृत्तपत्राने ज्या अभ्यासाचा आधारे ही बातमी दिली आहे त्या अभ्यासासंदर्भातील सविस्तर संशोधन अद्याप प्रकाशित झालेलं नाही. प्रकाशनापूर्वीचं काम सुरु असून लवकरच हे संशोधन सार्वजनिक केलं जाणार आहे. "हा पुरातन विषाणू सापडल्याने भविष्यात वनस्पती, प्राणी आणि मानवासाठी परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते," असं या 'व्हायरल' माहितीमध्ये म्हटलं आहे. प्राथमिक अहवालांनुसार वातावरण बदलांमुळे बर्फाच्या खाली असलेली उत्तर गोलार्धामधील अनेक ठिकाणी पहिल्यांदाच मानवाला संशोधनानिमित्त पोहोचता आलं आहे. पहिल्यांदाच या गोठलेल्या अवस्थेत असलेल्या विषाणूंशी मानवाशी संबंध आला आहे.
मात्र वातावरण बदलांमुळे 'मागील हजारो वर्षांपासून गोठलेल्या अवस्थेत असलेल्या या विषाणूंच्या माध्यमातून काही जैविक पदार्थांचं उत्सर्जन होण्याची शक्यता आहे,' असा अंदाज व्यक्त केला जातोय. यामध्ये प्राणघातक विषाणूंचाही समावेश असू शकतो. या जैविक घटकांमध्ये पेशी असलेले अतिसूक्ष्म जीव तसेच विषाणूंचा समावेश असू शकतो," असाही संशोधकांचा अंदाज आहे.
वैज्ञानिकांना हे झॉम्बी विषाणू सैबेरियन पठारावरील बर्फाच्या चादरीखालील गोठलेल्या तळ्यामध्ये आढळले. साथीचे रोग पसरण्यासाठी कारणीभूत असलेल्या आणि आतापर्यंत ठाऊक असलेला हा विषाणू ४८ हजार ५०० वर्षांपूर्वीचा असल्याचा अंदाज आहे. अनेकांना बाधित करणारा हा विषाणू संसर्गाच्या लाटेदरम्यान या बर्फाच्या चादरी खाली हजारो वर्षांपासून दाबला गेला. हा आता सध्या मानवाला ठाऊक असलेल्या सर्वात जुन्या विषाणूंपैकी एक ठरला आहे. यापूर्वी २०१३ मध्ये सैबिरियातच ३० हजार वर्षांपूर्वीच्या विषाणूचा शोध लागला होता. 'सायन्स अलर्ट'ने दिलेल्या वृत्तानुसार या संशोधनादरम्यान १३ वेगवेगळ्या विषाणूंचा शोध लागला असून प्रत्येकाची रचना ही वेगवेगळी आहे. रशियामधील याकुतिया येथील युकेची आल्स नावाच्या तळ्यामध्ये यापैकी मुख्य विषाणूचा शोध लागला आहे. बर्फाखाली गोठलेल्या अवस्थेत असलेल्या सैबेरियन कोल्ह्याच्या केसांमधून तसेच आतड्यांमधून इतर विषाणूंचे अवशेष वैज्ञानिकांना मिळाले आहेत. हे काही हजार दशकांपूर्वीचे विषाणू संसर्गास कारणीभूत ठरु शकतात. त्यामुळेच ते मानवाच्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे. करोनासारख्या विषाणूंच्या संसर्गाच्या लाटा यापुढे सामान्यपणे अनेकदा येतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# न्यायाधीशांच्या नियुक्तीवरुन सरकार व सर्वोच्च न्यायालय आमने- सामने



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मागील काही महिन्यांपासून केंद्र सरकारकडून न्यायमूर्तींच्या नियुक्तीवरून सुप्रीम कोर्टाचे कॉलेजियमवर प्रश्न उपस्थित केले जात असल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहेत. आता, केंद्र सरकारने उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या नियुक्तीबाबतची शिफारस पुन्हा सुप्रीम कोर्टाच्या कॉलेजियमकडे पाठवली आहे. जवळपास 20 जणांच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. यामध्ये ॲड. सौरभ कृपाल यांच्या नावाचाही समावेश आहे. त्यांनी याआधीच आपण समलिंगी असल्याचे जाहीर केले होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कॉलेजियमने शिफारस केलेल्या नावावर केंद्र सरकारने आक्षेप घेतला असून २५ नोव्हेंबर रोजी ही नावे पुन्हा पाठवण्यात आली होती.**

या पार्श्वभूमीवर केंद्रीय विधी आणि न्याय मंत्री किरण रिजिजू यांनी सर्वोच्च न्यायालयातील कॉलेजियम पद्धतीवर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. ही पद्धत भारतीय राज्यघटनेत एलियन सारखी असल्याचं विधान रिजिजू यांनी म्हंटले आहे सरकारकडे फाईल प्रलंबित आहे, असे म्हणू नका. सरकारकडे फाईल पाठवूच नका. तुम्ही स्वतःचं स्वतःची नेमणूक करा, अशी खोचक टीका रिजिजू यांनी केली आहे. भारतीय संविधान आणि जनतेने न्यायाधीशांना अधिकार दिले आहेत. जर केवळ न्यायाधीशांनीच निर्णय घ्यायचे असतील, तर मग लोकांचा या निर्णयाला पाठिंबा असेल अशी अपेक्षा कशी काय ठेवली जाऊ शकते, असेही रिजिजू यांनी म्हटले आहे.
कॉलेजियम पद्धत जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत सरकार या पद्धतीचा आदर करणारच आहे. पण जर केवळ कॉलेजियम पद्धतीनुसार शिफारस झाली म्हणून सरकारने नावांना मान्यता द्यावी, अशी जर तुमची अपेक्षा असेल, तर मग सरकारची काय भूमिका उरणार?, असा सवाल त्यांनी केला आहे. कॉलेजियम पद्धतीमध्ये त्रृटी आहेत. ही व्यवस्था पारदर्शक नसल्याचा आवाज लोक उठवत आहेत. त्यामुळे अपेक्षित पाऊलं सरकार उचलत आहे. जर एखाद्या न्यायाधीशाने लोकांच्या भावनांशी संबंधित प्रकरणावर भाष्य केले, तेव्हा न्यायाधीशांनी किंवा न्यायालयाच्या निकालाने लक्ष्मण रेखा ओलांडली का? याबाबत आम्हाला विचार करावा लागेल", असे रिजिजू यांनी म्हंटले आहे.तीस वर्षांपूर्वी ही व्यवस्था नव्हती, तेव्हा सरकार न्यायाधीश नेमायचे. खर तर केंद्र सरकारला पुन्हा तीच व्यवस्था आणायची आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीमध्ये कोणती कार्यपद्धती अवलंबली आहे, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केल्याने कॉलेजियमवर पुन्हा एकदा वाद सुरू झाला आहे. विद्यमान केंद्र सरकारला आपल्या शेवटच्या कार्यकाळातच कॉलेजियम पद्धत संपवायची होती, परंतु कायदेशीर अडथळ्यांमुळे ते करू शकले नाही. मात्र, ताज्या वादाच्या संदर्भात सरन्यायाधीशांनी संविधान दिनानिमित्त सांगितले की, संवैधानिक लोकशाहीत कॉलेजियमसह कोणतीही संस्था परिपूर्ण नसते आणि विद्यमान व्यवस्थेत काम करणे हाच त्यावर उपाय आहे. वास्तविक, सरकारकडून न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये राजकीय स्वार्थ पाहिला जात असल्याने कॉलेजियम व्यवस्था निर्माण झाली.
त्यामुळे जेव्हा विद्यमान सरकारने कॉलेजियम पद्धत संपवण्याचा प्रस्ताव मांडला, तेव्हा पुन्हा तोच युक्तिवाद सुरू झाला की, सरकारने न्यायाधीशांची नियुक्ती केली तर त्यांना राजकीय प्रभावापासून मुक्त ठेवण्याची खात्री देता येत नाही. कॉलेजियम पद्धतीत न्यायाधीशांची नियुक्ती न्यायाधीश करतात. त्यामुळेच अशा प्रकारे त्यांना पक्षपातीपणा दाखवण्याची संधी मिळते, असे वारंवार सांगितले जाते. उदाहरणार्थ, अनेक नावांचा उल्लेख आहे, जे एकाच कुटुंबातून येत आहेत. वडील न्यायाधीश झाले असतील तर त्यांचा मुलगाही न्यायाधीश होतो. तसेच मैत्री आणि नाती जपल्याचा आरोपही केला जातो. मात्र, कॉलेजियम व्यवस्थेत न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेत एवढा हलगर्जीपणाचे उदाहरण क्वचितच सापडेल, जे सरकार इतर विभागांच्या प्रमुखांची निवड करताना दिसते. ताजे प्रकरण निवडणूक आयुक्तांचे आहे, ज्यात चोवीस तासांत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली.
त्यामुळे सरकारने निवडलेल्या न्यायाधीशांमध्ये निःपक्षपातीपणाचा अभाव असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये सरकारचाही सहभाग असला तरी सर्वोच्च न्यायालयाने पाठवलेल्या काही नावांना सरकारने मान्यता दिली नसल्याची तर कधी ज्येष्ठतेच्या क्रमाने कनिष्ठांना पदोन्नती दिल्याच्या घटना घडल्या आहेत. आहे.
सर्वोच्च न्यायालयाची विश्वासार्हता अशी आहे की त्याने स्वतःला राजकीय दबावापासून दूर ठेवले आहे. कॉलेजियम व्यवस्थेच्या बाजूने असलेले तज्ज्ञांचे मत दुर्लक्षित करता येणार नाही की न्यायाधीशांच्या नियुक्तीचा अधिकार न्यायाधीशांना देण्यात आला कारण त्यांना त्यांची क्षमता आणि बांधिलकी अगदी जवळून माहीत आहे.
निःसंशयपणे, त्यांच्या नियुक्तीमध्ये कुटुंबवादाची काही उदाहरणे आढळतात, परंतु या नियुक्ती प्रक्रियेबाबत कठोर नियम आणि कायदे आहेत, त्यामुळे मनमानी होत नाही. असे असले तरी, ताज्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर या विषयावर नव्याने आणि गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे की, न्यायाधीश जर न्यायाधीशांची नियुक्ती करू शकत नसतील, तर सर्व नियुक्त्या राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त का होऊ नयेत.

**कॉलेजियम सिस्टिम म्हणजे काय?**

उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका या न्यायाधीशांच्या एका गटामार्फत केल्या जातात. त्याला कॉलेजियम म्हणतात. यामध्ये न्यायाधीशांचाच समावेश असून, या विशेष न्यायाधीशांची नियुक्ती सरन्यायाधीशांच्या आदेशानेच केली जाते.
सरन्यायाधीश हे अन्य चार ज्येष्ठ न्यायाधीशांच्या मदतीनेच उच्च न्यायलय किंवा सर्वोच्च न्यायालयाचे अन्य न्यायाधीश निवडतात. हा कॉलेजियम न्यायाधीशांची नावे सुचवतो, मग तशी शिफारस सरकारकडे केली जाते आणि नंतर त्यांची रीतसर नियुक्ती होते.



# रोजगार हिरावून घेतोय रोबोट



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**लोकसंख्या जसजशी वाढते आहे, तसतशी रोजगाराची समस्यादेखील बिकट होत चालली आहे. भारत देश हा तरुणांचा देश आहे. मात्र या तरुणांकडे कुशलतेचा मोठा अभाव आहे. ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण देशात आहे. मानव संसाधनसंबंधीत संशोधनासाठी प्रसिद्ध असलेल्या मॅन पॉवर ग्रुप या जागतिक संघटनेच्या टॅलेंट शॉर्टेज सर्वे 2018 च्या अहवालानुसार जगभरातील 45 टक्के उद्योजक, व्यावसायिक कुशल मनुष्यबळाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना लागणाऱ्या उपयुक्त प्रतिभावंतांच्या कमतरतेला तोंड द्यावे लागत आहे. भारतातदेखील 53 टक्के नियुक्ती देणाऱ्यांना त्यांच्या रिक्त जागांवर योग्य असे कर्मचारी मिळेनासे झाले आहेत. एकिकडे कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत असताना दुसरीकडे रोजगाराबाबतीत दुसरीच चिंता तज्ज्ञांना सतावत आहे.**

ही चिंता आहे, ती रोबोट म्हणजेच यंत्रमानवांची वाढत असलेली संख्या. सध्या विख्यात लेखक मार्टिन फोर्ड यांनी लिहिलेल्या रोबोट्सचा उदय, त्याचबरोबर टेक्नॉलॉजी आणि रोजगारसंबंधी भविष्यातील धोके यासंदर्भातील पुस्तक जगभरात मोठ्या गंभीरतेने वाचले जात आहे. या चर्चित पुस्तकात मार्टिन फोर्ड यांनी म्हटले आहे की, टेक्नॉलॉजीचा अविष्कार असलेला रोबोट आगामी काळात अनेकांचे रोजगार हिरावून घेणार आहे. यात सामान्यांपासून वरच्या पातळीवरच्या कुशल मनुष्यबळांचादेखील समावेश असणार आहे. यापूर्वी आपण कथा-गोष्टींमध्ये वाचलेला आणि सिनेमात पाहिलेला रोबोट अर्थात यंत्रमानव याची फक्त कल्पनाच केली होती.परंतु, अल्पावधीतच ते सत्यात उतरले आहे. मात्र याच रोबोटमुळे 21 व्या शतकात जागतिकीकरण आणि यांत्रिकीकरणाच्या विस्ताराबरोबरच गेल्या कित्येक शतकांपासून चालत असलेले मनुष्यबळ आणि बौद्धिक श्रेष्ठत्व नष्ट होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. जगातल्या काही देशांमध्ये रोबोट सामान्य जनजीवन आणि उद्योग-व्यवसाय या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण



भूमिका बजावताना दिसत आहे. काही देशांमधल्या हॉटेलमध्ये रोबोट जेवण बनवणारा आचारी बनला आहे, तर काही ठिकाणी ताटे लावणे, जेवण वाढणे अशी वेटरची कामे करताना दिसत आहेत. जगभरात सर्वाधिक रोबोटची संख्या जपानमध्ये आहे. जपानमध्ये जवळपास 3.50 लाख, अमेरिकेत पावणेदोन लाख तर चीनमध्ये एक लाखांपेक्षा अधिक रोबोट कार्यरत आहेत. भारतात रोबोटची संख्या 16 हजारांपेक्षा अधिक आहे. रोबोटची उपयुक्तता कमालीची असून तो कुठल्याही क्षेत्रात सफाईदारपणे काम करू शकतो. औद्योगिक क्षेत्रात कामगार, लष्करात सैनिक, सिक्युरिटी गार्ड, हॉटेलमधला कामगार अशा अनेक क्षेत्रात रोबोटचा वावर वाढला आहे. वैद्यकीय क्षेत्रात तर त्याचे महत्त्व आणखीणच वाढले आहे. अवघड शस्त्रक्रियेसाठी सध्याला त्याचीच मदत अधिक होत आहे. सामान्यांपासून उच्च क्षेत्रापर्यंतच्या अधिकारी वर्गापर्यंत रोबोटने आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. त्यामुळे यांच्या रोजगारांवर गंडांतर येणार आहे. भारतासारख्या विकसनशील देशांनादेखील या पुढच्या भविष्यकाळात याचा मोठा फटका बसणार आहे. जे लोक कॉम्प्युटर प्रशिक्षित नाहीत, त्यांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. त्यामुळे प्रशिक्षण, शिक्षण आणि कौशल्य या आघाडीवर रोजगार गमावण्याच्या संकटाकडे सगळ्यांनीच जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अमोल मिटकरींच्या भाषणाला जयंत पाटील हसले, मग ब्राह्मणाच्या मंत्रात कसे फसले?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**राजकारणाच्या वर्तुळात पुढारी स्वत:चा भाव मारण्यासाठी शब्दांची चिखलफेक करत गरळ ओकुन जातात पण त्याचे परिणाम समाज व्यवस्थेवर कसे होतात?याचं भान त्यांना रहात नाही. एखाद्याच्या वक्तव्यावर पोट फुटेपर्यंत हासणारे कदाचित तेच प्रसंग भविष्यात त्यांच्याच अंगलट जेव्हा येतात तेव्हा शब्दफेकीत आडकुन जातात असंच काही राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या बाबतीत घडुन गेल्याचे लक्षात आले. आ.अमोल मिटकरी यांनी काही महिन्यापुर्वी ईस्लामपुरच्या जाहिर सभेत भाषण करताना कन्यादान ब्राह्मणांकडून केल्याने काय होतं? हे सांगताना भार्या समर्पयामी छातीफाड उल्लेख केला.**

व्यासपीठावर उपस्थित असलेले जयंतराव आणि मंत्री धनंजय मुंडे गालफुगी येऊपर्यंत मोठ्या मोठ्याने हासले. पण चार दिवसापुर्वी सांगलीच्या पावनभुमीत जयंतरावच्या मुलाचा विवाह पार पडला. त्यात कन्यादान ब्राह्मण मंत्रोपचाराने झाले तर आंतरपाट ब्राह्मणांनीच धरून मंगलाष्टिका म्हटल्या. मग जयंतरावच्या हासण्याचं काय? प्रश्न असा पडतो एखाद्या फालतु प्रसंगाची चेष्टा कुणी केली? तर हासुन साक्ष दिल्याची कशी अंगलट येते? हा अनुभव जेष्ठ नेते जयंतराव पाटलांना लगेच घ्यावा लागला.

त्याचं असं आहे की, राजकारणात सतत शब्दांच्या फेकीमुळे वेगवेगळे चढउतार निर्माण होत असतात. समाज व्यवस्थेत राजकारण असा एक भाग ज्यातुन आदर्श प्रस्थापित होतात. त्यासाठी राजकिय नेते संस्कारित असणं तो वेगळा भाग. अलीकडच्या काळात राजकिय वर्तुळात वाचाळवीरांचा वाढलेला जास्तीचा हस्तक्षेप समाजात द्वेषाची भावना निश्चित निर्माण करणारा झाला. अमोल मिटकरी राष्ट्रवादी पक्षात आल्याबरोबर आमदार झाले. माळ गळ्यात पडताच त्यांची बोलीभाषा प्रसिद्धी झोतात आली. माध्यमांवर एकदा चेहरा आला की राजकिय पुढाऱ्यांना व्यसन लागतं. तसंच मिटकरी यांचं झालं. कोणत्या वेळी काय बोलतील? कुणावर आरोप करतील? याचा नेम लागत नाही. अनेकदा पक्ष नेतृत्वाला अशा वाचाळवीरांना ताकद द्यावी लागते तेच नेमकं मिटकरी यांच्या बाबतीत घडलं. पण सहज बोलल्यानंतर त्याचे परिणाम कसे होतात? आणि कसे भोगावे लागतात? याचं उत्तम उदाहरण म्हणजे ईस्लामपुरचा कार्यक्रम. काही महिन्यापुर्वी राष्ट्रवादी पक्षाची जाहिर सभा ईस्लामपुरला होती. प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील, धनंजय मुंडे यांची विशेष उपस्थिती. अमोल मिटकरी यांनाही निमंत्रित करण्यात आलं होतं. समोर उपस्थिती पाहिल्यानंतर वाचाळवीरांना बोलण्याचा मोह आवरता येत नाही हे तितकच खरं आहे. त्यात मिटकरी सारखे छातीफाड पुढारी यांनी तर कहरच केला. जाहिरपणे बोलताना ब्राह्मण मंत्रोपचाराची टिंगल केली. कन्यादान कुणाच्या हस्ते करावे? यावरही भाष्य करताना ब्राह्मणांकडून कन्यादान तथा विवाह लावताना भार्या समर्पयामी आणि याचा मराठीतुन अर्थही त्यांनी लोकांना सांगितला. वैचारिक ज्ञानाचे दिवे पाजळताना मिटकरींच्या भाषणाला जोरदार टाळ्या पडल्या. उपस्थित असणाऱ्या जयंतराव आणि धनंजयराव यांनाही हसु रोखता आले नाही. पोट फुटेपर्यंत मंत्री हसत राहिले. कदाचित ब्राह्मण द्वेष या नेत्यांच्या मनात कसा आणि किती भरला? याचं जाहिर प्रकटन महाराष्ट्राच्या जनतेने पाहिलं. तदनंतर केवळ ब्राह्मण समाजात नव्हे तर इतर वर्गसमुहात देखील मिटकरींच्या विरोधात प्रचंड नाराजी पसरली. जातीय द्वेष निर्माण करणारं भाष्य म्हणून ही जाहिर सभा गाजली होती. एवढेच नव्हे तर वातावरण तापलं हे लक्षात आल्याबरोबर पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार आणि अजितदादा पवारांनी मिटकरींना चांगलं सुनावलं. नव्हे तर बोलण्याला लगाम घातला होता. कदाचित तेव्हापासून तरी वाचाळवीर थोडे शांत भुमिकेत दिसतात. पण ब्राह्मण समाजाची अशा प्रकारे चेष्टा करणे समाजबांधवांना अजिबात आवडलं नसुन आजही मटनकरी आमदाराचा सर्वत्र निषेध केला जातो.



राजकिय जीवनात प्रसंग कसे गंमतीशीर येतात? आणि त्याला सामोरे जावे लागतं हा अनुभव पुढाऱ्यांना नेहमीच येतो. ज्या प्रसंगावर जयंतराव पाटील खदखदुन हासले त्यांच्यावरही ब्राह्मण समाज प्रचंड नाराज आजही आहे. पण चार दिवसापुर्वी सांगलीच्या पावनभुमीत त्यांच्या मुलाचा विवाह समारंभ मोठ्या थाटामाटात पार पडला. हजारो वऱ्हाडांची उपस्थिती शिवाय दिग्गज नेते मंगल कार्याला आले होते. अर्थात कुठल्याही प्रकारची उणीव तिथे नव्हती. एवढा दिमाखदार सोहळा आणि तो होणे साहजिकच. पण चर्चा मात्र ईस्लामपुरच्या जाहिर भाषणाची आणि अमोल मिटकरींनी केल्याच्या टिकेची समोर आली. एक तर ज्या कन्यादान आणि भार्या समर्पयामी यावर जयंत पाटलांनी हासुन दाद दिली. त्यांनाच लेकाच्या विवाह कार्यात कन्यादान करण्यासाठी ब्राह्मणाला बोलवावे लागले. आंतरपाट आणि मंगलाष्टिकाही विद्यावाचस्पती उच्च प्रशिक्षित ब्राह्मणांकडून म्हणवुन घेतले. कदाचित अमोल मिटकरी विवाह कार्याला आले होते का नव्हते? याची माहिती अद्याप आमच्या हाती आलेली नाही. पण बोलायचं म्हणुन बोलायचं आणि कुणाच्याही बोलण्याला हासुन दाद दिली तर कशी फाटते? आणि आपल्यावर कशी बेतते? हा अनुभव जयंतराव पाटलांना घ्यावा लागला. प्रसारमाध्यमांनी दिमाखदार सोहळा माध्यमांवर दाखवला.त्याचबरोबर प्रत्येकाला मिटकरींनी केलेल्या भाषणाची आठवण आली. अनेकांनी जयंतराव पाटलांनी मिटकरींचा सल्ला का ऐकला नाही? अशी चर्चा करत सोहळ्याची खिल्ली उडवली. सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, राजकिय पुढाऱ्यांनी तोलुन मालुन बोलावं लागतं. सामाजिक तेढ, द्वेष निर्माण होईल अशी भाषा कधीच केली नाही पाहिजे. भाषण केल्यापासुन अमोल मिटकरींनी यंदाच्या मंगल हंगामात 100 पेक्षा अधिक लग्नाला उपस्थिती लावली. पण तिथे कन्यादान ब्रह्मदेवतेच्या उपस्थितीतच झाले. असं कुठे घडलंच नाही की लग्नमंडपात ब्राह्मण दिसले आणि मिटकरी पळुन गेले. याउलट ब्राह्मणांनी मंगलाष्टिका मंत्रोपचार आदेशित केल्यानंतर याच मिटकरींनी ब्राह्मणाचं ऐकुन हातातील मंगलाष्टिका वधु-वरांच्या अंगावर टाकल्या असतील. पण आपण काय बोलतो? किंवा काय बोलुन गेलो? कशासाठी बोललो? शेवटी हुजरेगिरी कुठपर्यंत असावी? स्वतःला एवढं हुशार का समजावं? असे अनेक प्रश्न ईस्लामपुरची जाहिर सभा आणि नंतर सांगलीत जयंतराव पाटलांच्या मुलाचा पार पडलेला विवाह नंतर समोर उभा राहिले ज्याची चर्चा आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात होताना दिसते. असो. याउपर काहीच बोलणे नाही. मोठ्या साहेबांनी तंबी दिल्यानंतर अमोल मिटकरीचं शांतता कोर्ट सुरू आहे असंच म्हणावे लागेल. जाता जाता पुन्हा या गोष्टीला उजाळा देण्यासाठी सोशल मिडियावर विशेषतः तरूणांनी मिटकरींच्या भाषणाच्या कॅसेट काढुन जयंतराव पाटलांना पाठवल्या हे मात्र नक्की. त्याहुन अधिक सांगायचं झालं तर नंतर मिटकरींच्या नावाचं रूपांतर मटनकरी असंही झालं.

# सीमा सुरक्षा दलास लक्ष्य का करावे ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशाच्या सीमांची सुरक्षितता आणि त्याच्याशी निगडित असलेले विषय ही सीमा सुरक्षा दलाची प्राथमिक भूमिका होय. सीमा सुरक्षा दलाचे काम शांतताकाळ आणि युद्घकाळ या दोन्हींत सातत्याने चालू असणे आवश्यक असते. बीएसएफचा समर्पण भाव जनतेच्या समक्ष ठेवत बापू- श्रीकृष्णदास निरंकारीजींचा लेखरूपाने दलाचे मनोबल वाढविण्याचा हा छोटासा प्रयत्न. सीमा सुरक्षा दल- बॉर्डर सिक्युअरिटी फोर्स म्हणजेच सीमेपलीकडून होणाऱ्या गुन्ह्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवून सीमेचे शांतता काळात संरक्षण करण्यासाठी नेमलेले सैन्यदल होय. देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांचे संरक्षण हे सैन्यदलाचे प्राथमिक कर्तव्य असले, तरी सदासर्वकाळ- विशेषतः शांतता काळातही- सैन्य तैनात करणे, हे एकूण सैन्याच्या युद्घक्षमतेला हानीकारक आहे.**

काही अशांत व जागृत सीमांवर सैन्यदलांच्या तुकड्यांची उपस्थिती अपरिहार्य असली, तरी बाकीच्या सीमांवर सैनिकीसम दलाची- पॅरामिलिटरी फोर्स योजना करणे, हे सीमा सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट ठरते. या सैनिकीसम दलाचे किंवा पोलीस दलाचे प्रमुख काम हे सीमोल्लंघन आणि तस्करीविरोधी स्वरूपाचे असते. किंबहुना हे काम सैन्यदलांच्या कक्षेबाहेरील आहे. यासाठी इ.स.१९४७ ते १९६५ दरम्यान भारताच्या धोकाविरहित सीमापट्ट्यांवर संबंधित राज्यांच्या जबाबदारीखाली राज्य सशस्त्र पोलिसांच्या- स्टेट आर्म्ड पोलीस तुकड्या तैनात केल्या जात असत. जम्मू व काश्मीरमधील काही भाग वगळता बाकी पूर्ण सीमापट्टा या पोलीस दलाच्या अधिक्षेत्राखाली होता. पाकिस्तानने कच्छ विभागातील सरदार पोस्ट, छाड बेट आणि बेरिया बेट या गुजरात राज्यातील सशस्त्र पोलिसांच्या चौक्यांवर दि.९ एप्रिल १९६५ रोजी अचानक हल्ले चढवले गेले. त्यानंतर मात्र हे सर्व बदलावे लागले. राज्य सशस्त्र पोलीस दल शत्रूच्या सैन्याकडून होणाऱ्या पद्घतशीर हल्ल्याचा प्रतिकार करण्यास असमर्थ असल्याचे स्पष्ट झाले. त्यासाठी लागणारे युद्घसाहित्य, प्रशिक्षण आणि सैनिकी सामर्थ्य स्वाभाविकच सशस्त्र पोलिसांकडे नव्हते. त्यामुळे शत्रूच्या हल्ल्यानंतर माघार घेण्याशिवाय त्यांच्यापुढे अन्य कोणताच पर्याय उरला नव्हता. शांतताकाळ किंवा युद्धकाळ या बाबतीत सर्व दृष्टींनी विचारविमर्ष झाल्यावर पाकिस्तानला लागून असलेल्या सीमांवर एका विशेष, केंद्रनियंत्रित आणि शत्रूच्या हल्ल्याचा समर्थपणे प्रतिकार करू शकणाऱ्या पोलीस दलाची आवश्यकता असल्याची खात्री केंद्र शासनाला पटली. तेव्हा सीमा सुरक्षा दल या विशेष पोलीस दलाची रचना करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आजच्या दिवशी दि.१ डिसेंबर १९६५ रोजी भारतीय सीमा सुरक्षा दलाची स्थापना झाली. भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी के.एफ्.रुस्तमजी यांची पहिले दलप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत या दलाचे कार्य चालते. या दोन वेगवेगळ्या परिस्थितीत त्यांच्या कामांची जंत्री अशी- १) शांतता काळातः सीमा प्रदेशात राहणाऱ्या जनतेत सुरक्षिततेच्या भावनेची जोपासना करणे सीमापार गुन्हे आणि अवैध प्रवेश- निर्गमनावर प्रतिबंध लादणे आणि चोरीची आयात-निर्यात आणि इतर अवैध कारवायांवर नियंत्रण ठेवणे. २) युद्घकाळातः दुय्यम धोक्याच्या क्षेत्रांमध्ये शत्रूच्या हल्ल्याविरुद्घ संरक्षणफळी उभी करून महत्त्वाच्या ठिकाणांचे संरक्षण करणे. तसेच विस्थापितांचे नियंत्रण-पुनर्वसन करून निर्देशित क्षेत्रात घुसखोरीविरुद्घ कारवाई करणे. सीमा सुरक्षा दलाच्या कार्यक्षेत्रास वेगवेगळे नवे पैलू प्राप्त झाले आहेत. या दलाच्या तुकड्या संयुक्त राष्ट्रांमार्फत शांतता प्रस्थापनेसाठी कोसोव्हो आणि बोस्नियामध्ये पाठवल्या गेल्या. केवळ पाकिस्तान सीमेपर्यंतच मर्यादित न राहता सीमा सुरक्षा दलाच्या तुकड्या उपद्रववादी विरोधी कार्यवाहीसाठी मणिपूर राज्यातही तैनात आहेत. गुजरातमधील जानेवारी २००१ मधील भूकंप आणि इतर जातीय दंगलींदरम्यान सीमा सुरक्षा दलाने लक्षणीय कामगिरी बजावली आहे. या दलाच्या उपलब्धींचा धावता आढावा घ्यायचा म्हटल्यास इ.स.१९९० ते २००८ या एकोणीस वर्षांच्या कार्यकाळात दलाने ४,८११ दहशतवादी ठार केले, ११,७८७ घुसखोर पकडले, १५,७५६ शस्त्रे जप्त केली, १,९२३ कोटी रुपये मूल्यांची चोरटी आयात-निर्यात पकडली आणि १३,६५४ किग्रॅ स्फोटके जप्त केली. या कालखंडात सुरक्षा दलांच्या १,३७३ जवानांनी प्राणाहुती दिली, तर ५,६६५ जवान जखमीही झाले. ही आकडेवारी सीमा सुरक्षा दलाच्या सर्वोच्च राष्ट्रसेवेची द्योतक होय. एवढे असूनही सीमा सुरक्षा दलालाच नेहमी का लक्ष्य केले जाते? हे जाणून घेण्यापूर्वी बीएसएफ बाबतच्या या नऊ महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्यायला हव्यात- १) बीएसएफची स्थापना इ.स.१९६५ साली करण्यात आली होती. तत्कालीन लष्कराच्या मनुष्यबळ आणि साधन सामुग्रीच्या मर्यादा लक्षात घेता हे निमलष्करी दल स्थापण्यात आले. २) बीएसएफचे संस्थापक के.एफ.रुस्तमजी यांनी सन १९७१च्या बांगलादेश युद्धात महत्त्वाची भूमिका बजावली होती. ३) बीएसएफच्या स्थापनेतील योगदान लक्षात घेता तटरक्षक दलाच्या स्थापनेसाठी त्यांना पाचारण करण्यात आले होते. ४) १८६ बटालियन आणि २.४ लाख जवान असणाऱ्या या दलाला इण्डियाज फर्स्ट वॉल ऑफ डिफेन्स म्हणजे भारताची पहिली संरक्षक भिंत, असे म्हटले जाते. ५) "जीवन पर्यंत कर्तव्य" हे बीएसएफचे घोषवाक्य आहे. दुर्गम भागात जाण्यासाठी बीएसएफकडे उंट आणि श्वानपथकाची वेगळी फौज आहे.६) सन २००१च्या भूज भूकंपात पीडितांना मदत करण्यासाठी सर्वप्रथम बीएसएफचे जवान पोहोचले होते. ७) दंगली आटोक्यात आणण्यासाठी ज्या अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर होतो, तो अश्रुधूर निर्माण करणारे टिअर स्मोक युनिट हे बीएसएफतर्फे चालवले जाते. ८) पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या संस्थेत आता स्त्रियांचासुद्धा समावेश करण्यात आला आहे. ९) बीएसएफच्या काही अधिकाऱ्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता मोहिमांवर पाठवले जाते. सीमा सुरक्षा दलाच्या स्थापनेपासून आजतागायत हे दल राष्ट्रसेवेसाठी झटत आहे. भारत-पाक यांच्यामधील सन १९७१चे बांगला देश युद्घ आणि सन १९९९चे कारगिल युद्घ या दोन्हींमधील त्यांची कामगिरी कौतुकास्पद आहे. दिवस-रात्र डोळ्यात तेल घालून सीमासंरक्षण करणाऱ्या या दलाचे कार्य सुकर आणि परिणामकारक होण्यासाठी भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमा आणि जम्मू व काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर अभेद्य लोखंडी कुंपण बांधून रात्री दोन्ही बाजूंचे क्षेत्र स्पष्ट दिसण्यासाठी त्यावर रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे घुसखोरांचे प्रमाण कमी होऊन सीमा सुरक्षा दलाच्या जवानांच्या कामास मदत मिळाली आहे. सीमा सुरक्षा दलाला १ महावीरचक्र, ४ कीर्तिचक्रे, ११ वीरचक्रे, १० शौर्यचक्रे आणि ५६ सेनापदके या वीरसन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्याशिवाय अनेक सन्मान त्याच्या अधिकारी आणि जवानांना व्यक्तिगत पातळीवर प्राप्त झाले आहेत. राष्ट्रसेवेसाठी वाहून घेतलेल्या सीमा सुरक्षा दलाचे हे धवल राष्ट्रकार्य भविष्यातही चालू राहील यात तीळमात्रही संदेह नाही!



बीएसएफ- सीमा सुरक्षा दल स्थापना दिन विशेष

# आणखी किती जीवघेणे पूल आहेत देशात?



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**रेल्वे पूल अपघात म्हणजे रेल्वे प्रशासनाची निष्काळजीपणाच म्हणावा लागेल.कारण या पुलावरून प्रवाशांचे आवागमन होतेच यात दुमत नाही.परंतु रेल्वे कर्मचारी व अधिकारी सुध्दा या पुलावरून रोजच आवागमन करतात.तेव्हा रेल्वे प्रशासनाला ही बाब लक्षात का आली नाही की पुलांची हालत खस्ता होत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकारला व रेल्वे प्रशासनाला कल्पना होती की बल्लारपूर रेल्वे ब्रिज खस्ता अवस्थेत आहे.तरीही रेल्वे विभागाने प्रवाशांसाठी खुला का ठेवला?असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात भेडसावत आहे.**

बल्लारपूर रेल्वे ब्रिज पुलाला भगदाड पडल्याने 20 फुटांवरून 22 प्रवासी खाली कोसळले. यात 2 प्रवासी गंभीर जखमी झालेत तर 1 महिला प्रवासीचा मृत्यू झाला. हीबाब रेल्वे प्रशासनाच्या दृष्टीकोनातून दुर्दैवीच म्हणावी लागेल.कोसळलेल्या पुलाला तब्बल 45 वर्षे झालीत. परंतु कोणाच्याही कसे लक्षात आले नाही की हा पुल खस्ता अवस्थेत आहे?म्हणजेच रेल्वे प्रशासनाला लोकांच्या जिवाची अजीबात पर्वा नसल्याचे स्पष्ट दिसुन येते.खस्ता अवस्थेतील हा फक्त बल्लारपूर (चंद्रपूर) चाच नाही तर अशीच अवस्था महाराष्ट्रातील अनेक रेल्वे पुलांची राहु शकते याला नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात मोठे रेल्वेचे जाळे आहेत.त्यामुळे बल्लारपूर रेल्वे पुलाची घटना लक्षात घेता भारतातील कीतीतरी पुल जिर्ना अवस्थेत असतील हे सांगणे कठीण आहे.त्यामुळे



केंद्र सरकारने व रेल्वे प्रशासनाने अशा दुर्घटना टाळण्यासाठी ताबडतोब रेल्वे पुलाची दुरूस्ती युद्धपातळीवर करायला हवी.रेल्वे प्रशासनाने बल्लारपूर रेल्वे पुलाचे दुरूस्तीकरण केले असते ही दुर्घटना टळता आली असती.कारण रेल्वे पुलाची ही पहीलीच घटना नाही.अनेक घटना सरकारच्या व रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे व चुकांमुळे झालेल्या आहेत.29 सप्टेंबर 2017 मुंबईतील प्रभादेवी स्टेशनवर एकाचवेळी चार रेल्वे आल्याने अरूंद ब्रिजवर एकाचवेळी गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी होऊन 23 जण ठार तर 39 जण जखमी झाले होते.3 जुलै 2018 ला मुसळधार पावसामुळे अंधेरी स्टेशनवरील पुलाचा काही भाग कोसळल्याने 5 जण जखमी झाले होते.14 मार्च 2019 संध्याकाळी गर्दीच्या वेळी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ (सीएसएमटी) फुट ओव्हर ब्रिज कोसळल्याने 6 जण ठार तर 38 जण गंभीर जखमी झाले होते.अशा भयावह घटना डोळ्यासमोर असुनही बल्लारपूर रेल्वे पुलाची पुनरावृत्ती झाली हीबाब रेल्वे प्रशासनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.ह्या घटना फक्त महाराष्ट्रातील आहे यापुर्वी देशात अशा कितीतरी घटना झाल्या असाव्यात. रेल्वेपुलाच्या कोणत्याही छोट्या घटना मोठे रूप धारण करू शकतात.त्यामुळे रेल्वे प्रशासनाने कोणत्याही घटनेची वेळीच दखल घेतली पाहिजे. तेव्हाच रेल्वे पुलाच्या दुर्घटना किंवा इतर कोणत्याही दुर्घटना टळता येईल.त्याचप्रमाणे रेल्वे पुलाच्या महाराष्ट्रासह देशात झालेल्या दुर्घटना लक्षात घेता.रेल्वे प्रशासनाने,राज्य सरकारने व केंद्र सरकारने कोणत्याही प्रकारचा विलंब न करता रेल्वे पुलाची दुरूस्ती ताबडतोब करावी.

# मूल्यशिक्षण काळाची गरज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**एका चौदा वर्षाच्या मुलीने आपल्याच पाच वर्षांच्या लहान बहिणीची ब्लेडने वार करून हत्या केल्याची खळबळजनक घटना जालना शहरात घडली. या घटनेने जालना शहरासह संपूर्ण राज्यात खळबळ माजली आहे. अर्थात अल्पवयीन मुलांनी आपल्याच नातेवाईकांची किंवा मित्रांची हत्या केल्याची ही राज्यातील पहिलीच हत्या नाही. याआधीही अशा अनेक घटना राज्यात घडल्या आहेत. टीव्ही वरील क्राईम मालिका पाहून अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची पुण्यातील घटना अजूनही सर्वांच्या स्मरणात आहे. मागील वर्षी खेड तालुक्यातील कळुस गावात एका तडीपार गुंडाची चार अल्पवयीन मुलांनी धारदार हत्याराने खून केल्याची बातमी वर्तमानपत्रात आली होती.**

अल्पवयीन मुलांकडून असे गुन्हे घडल्याच्या बातम्या सातत्याने वाचायला व पाहायला मिळतात. देशात अलीकडे बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. बाल गुन्हेगारीचा लेखा जोखा मांडणारा क्राईम इन इंडियाचा अहवाल मागील वर्षी प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालानुसार देशात अल्पवयीन मुलांवर दरवर्षी सरासरी ३५ हजार गुन्हे नोंदवले जातात. महाराष्ट्रात हेच प्रमाण ६ हजारांच्या आसपास आहे. अर्थात ही आकडेवारी नोंदवलेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलीस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत दुःखाची, धक्कादायक बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढली जातात असे म्हटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत. परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो पण जालन्यातील घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. या घटनेतील ज्या मुलीने आपल्या लहान बहिणीची हत्या केली आहे तिचे आई वडील सुशिक्षित आहे. ती मुलगी एका प्रतिष्ठित शाळेची विद्यार्थिनी आहे. या आधी पुण्यात ज्या अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केली त्या मुलाचे पालकही उच्चशिक्षित होते. म्हणजेच सुशिक्षित कुटुंबातील मुलेही आता गुन्हेगारीकडे वळत आहेत. भारतासारख्या देशात बाल गुन्हेगारी वाढणे ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, डॉन, दादा बनण्याची मोठी क्रेझ आहे त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, ग्रुप वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने मुले चोऱ्या, मारामारी,खून यासारख्या गुन्ह्यांत अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला, मार्गदर्शन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक यांच्याकडून योग्य संस्कार आणि मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहानवयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार



आई वडिलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले का दुर्लक्ष करतात याचाही विचार पालक आणि शिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे. याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थितीही जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाटेल ते करतात. त्यांना मोठमोठ्या इंटरनॅशनल स्कुलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना ज्या हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात. पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटूंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटेच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात मग दिवसभर टीव्हीवरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका आणि हिंसक मोबाईल गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर योग्य संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण ही काळाची गरज बनली आहे.

# समलिंगी विवाहाबद्दल भारतीय कायदा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सिंगापूर सरकारने समलैंगिक संबंधांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. सिंगापूरचे पंतप्रधान ली सिएन लूंग यांनी एका मेळाव्यात जाहीर केले की त्यांचे सरकार पुरुषांमधील संमतीने लैंगिक संबंधांना गुन्हेगार ठरवणारा वसाहतकालीन कायदा रद्द करण्यास तयार आहे. या निर्णयानंतर आता सिंगापूरमध्ये समलिंगी संबंध बेकायदेशीर राहणार नाहीत. भारतातही सुप्रीम कोर्टाने २०१८ मध्ये समलिंगी संबंधांबाबत मोठा निकाल दिला आहे. मात्र, या दोघांच्या लग्नाबाबत दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.**

हिंदू विवाह कायद्यांतर्गत समलिंगी विवाहांच्या नोंदणीला विरोध करणाऱ्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. यापूर्वी, खंडपीठ लेस्बियन, गे, बायसेक्शुअल, ट्रान्सजेंडर आणि क्विअर (LGBTQ प्लस) समुदायातील व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करत होते. काय होते कलम ३७७? २०१८ पर्यंत, भारतात समलिंगी संबंध बेकायदेशीर मानले जातात. भारतात समलैंगिक संबंधांविरोधात ब्रिटिश सरकारने कायदा केला होता. ब्रिटीश सरकारने कलम ३७७ ची तरतूद केली आणि ज्या देशांनी राज्य केले तेथे ते लागू केले. भांदवी च्या कलम ३७७ ने "कोणत्याही पुरुष, स्त्री किंवा प्राण्याशी अनैसर्गिक शारीरिक संबंध" बेकायदेशीर आणि दंडनीय बनवले आहेत. मात्र, २०१८ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी संबंधांना मान्यता दिली आहे. मूलभूत अधिकार काय आहेत? संविधानात भारतातील नागरिकांना कलम २१ अन्वये मूलभूत अधिकार देण्यात आले आहेत. पण याचा वापर करून समलिंगी विवाह हा मूलभूत अधिकार बनवता येणार नाही. भारतीय राज्यघटनेनुसार सामान्य विवाहाला मूलभूत किंवा घटनात्मक अधिकार म्हणून स्पष्ट मान्यता नाही. सर्वोच्च न्यायालयाने काय आदेश दिला होता? २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश दीपक मिश्रा यांनी भांद वी कलम ३७७ ला गुन्हेगार ठरवले. तथापि, याचा अर्थ असा नाही की समलिंगी विवाह कायदेशीर झाला आहे. समलैंगिकांमधील आंतरविवाह कायदेशीर आहे की नाही यावर स्वतंत्र वाद आहे. केंद्र सरकार विरोध का करत आहे? खरे तर या प्रकरणाची दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यात हायकोर्टाने केंद्र सरकारकडून उत्तरही मागवले होते. सुनावणीदरम्यान, केंद्र सरकार म्हणते की, भारतात लग्नाला तेव्हाच मान्यता दिली



जाऊ शकते जेव्हा विवाह 'जैविक पुरुष' आणि 'जैविक स्त्री' यांच्यात मूल जन्माला घालण्यास सक्षम असेल. या युक्तिवादाने केंद्र समलिंगी वादाला बेकायदेशीर ठरवत आहे. सरकारची भूमिका अशी आहे की घटनेच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत अधिकार कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेच्या अधीन आहे आणि समलिंगी विवाहाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश करण्यासाठी त्याचा विस्तार केला जाऊ शकत नाही. समलिंगी विवाह "कोणत्याही वैयक्तिक कायद्यात किंवा कोणत्याही वैधानिक वैधानिक कायद्यात मान्यताप्राप्त किंवा मंजूर केलेले नाहीत.समलिंगी विवाह आणि मूलभूत हक्कांबाबत विराग गुप्ता सांगतात, "खरं तर मूलभूत अधिकारही त्या गोष्टींसाठी बनवले जातात ज्यासाठी देशात कायदा आहे. ज्यांच्यासाठी कायदाच नाही, तो मूलभूत अधिकार कसा बनणार?

"मुलभूत अधिकारांतर्गत, त्यांनी त्यांच्या आवडीचा जोडीदार निवडला तरी ते लग्न कसे करतील कारण त्यांच्या लग्नासाठी कोणताही कायदा नाही. लग्न करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण जर तुम्हाला कायदेशीर विवाह करायचा असेल तर तो कायद्यानुसारच करावा लागेल. अशा स्थितीत मूलभूत अधिकाराचे उल्लंघन कसे होणार? मात्र, विवाहाशी संबंधित कायद्यांमध्ये बदल करून हा अधिकार निश्चितपणे मिळवता येईल. समलैंगिकांची समानता सुनिश्चित करण्यासाठी विवाह कायद्यात बदल करण्यात यावेत, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे. जगभरात असे २९ देश आहेत जिथे समान कायदेशीर गुंतागुंत असूनही समलिंगी विवाहाला मान्यता देण्यात आली आहे. काही देशांमध्ये न्यायालयाच्या माध्यमातून, काहींमध्ये कायद्यात बदल करून, तर काहींमध्ये सार्वमताद्वारे हा अधिकार देण्यात आला.

समलैंगिकांसाठी घरगुती हिंसाचाराच्या कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्याच्या समस्येसारख्या विवाहाशी संबंधित इतर कायद्यांबाबत अजूनही चर्चा सुरू आहे. पण, त्यांच्या लग्नाला मान्यता मिळाली आहे.

# औरंगाबाद : 2024चा खासदार कोण ?

आधुनिक केसरी

**2019 ला अटीतटीच्या झालेल्या लढतीत खासदार इम्तियाज जलील यांनी माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना धक्का देत संभाजीनगर मतदारसंघ काबीज केला. खरंतर संभाजीनगर लोकसभा मतदारसंघ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा बालेकिल्ला. दांडगा जनसंपर्क आणि हिंदुत्वाचे कार्ड खेळत, विरोधी पक्षातील नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध राखत माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी हा मतदार संघ चार वेळेस काबीज केला. मात्र कन्नडचे शिवसेनेचे माजी आमदार हर्षवर्धन दादा जाधव यांनी शिवसेने विरोधात बंडखोरी करून लोकसभा लढवली. अपक्ष उभे राहत विक्रमी पावणे तीन लाख मतं त्यांनी घेतली. हे मतांचे विभाजन खासदार इम्तियाज जलील यांच्या पथ्यावर पडलं. एम आय एम आणि वंचित बहुजन आघाडीची एक गठ्ठा मतं त्यांना मिळाल्याने ते अनपेक्षितरित्या संभाजीनगर मतदारसंघातून निवडून आले.**

2024 ला संभाजीनगर मतदारसंघ राखण्यास मोठ आवाहन खासदार इम्तियाज जलील यांच्यासमोर आहे. वंचित बहुजन आघाडीची मतं घेऊन खासदार झालेले इम्तियाज जलील महाराष्ट्रातल्या इतर मतदारसंघांमध्ये एमआयएम मात्र वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभं न राहिल्याने ही युती तुटली. आता वंचित बहुजन आघाडीच्या पाठिंब्याशिवाय खासदार इम्तियाज जलील यांना हा गड राखण शक्य होईल का? असा प्रश्न मतदारांकडून विचारला जात आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात जे धार्मिक विद्वेषाचे वातावरण निर्माण केलं गेलं. मात्र तशी कुठलीही तीव्र प्रतिक्रिया मागील पाच वर्षांमध्ये संभाजीनगर मतदारसंघांमध्ये उमटली नाही. एक अर्थाने हे इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाच यश मानाव लागेल. धार्मिक विद्वेषावर पोळ्या भाजणाऱ्यांना इम्तियाज जलील यांनी दिलेली ही एक चपराक आहे. संसदेत विविध विषयांची उत्तम मांडणी, वादग्रस्त विषयात हस्तक्षेप न करणे, उत्तम वक्तृत्व कौशल्य, आणि विकास निधीच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न या खासदार जलील यांच्या काही जमेच्या बाजू आहेत. पण एवढ्यावरच त्यांना 2024 ला संभाजीनगर मतदारसंघ काबीज करता येईल का? हे सांगन जरा कठीण आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे जर एकत्र आले तर याचा पहिला धक्का खासदार इम्तियाज जलील यांना बसेल. भाजपाच्या शतप्रतिशत भाजपा धोरण अंतर्गत संभाजीनगर वरही त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय जनता पक्षाकडून संभाजीनगर मतदारसंघासाठी काही संभाव्य नाव चर्चेत आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या माजीअध्यक्ष आणि माजी महापौर विजयाताई रहाटकर, विद्यमान केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, माजी जिल्हाध्यक्ष एकनाथ जाधव, आणि निवडणुकांचे उत्तम व्यवस्थापन करून ते जिंकण्यात तरबेज असणारे संभाजीनगर लोकसभेचे प्रभारी आणि गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रशांत बंब यांच्या नावाचा ही अंतिम क्षणी विचार केला जाऊ शकतो. एम आय एम कडून खासदार इम्तियाज जलील तर भारतीय जनता पक्षाकडून वरीलपैकी कुठल्यातरी एकाला उमेदवार म्हणून मैदानात उतरवल जाईल. इथे प्रश्न आहे शिवसेनेचा. कारण शिवसेनेतील बंडखोरीनंतर वैजापूरचे आमदार रमेश बोरणारे, पश्चिम मधून आमदार संजय शिरसाठ, मध्य मधून आमदार प्रदीप जैस्वाल, हे तीनही शिवसेनेचे आमदार आता शिंदे गटात आहे. संभाजीनगर मतदारसंघात शिवसेनेला एवढा मोठा भगदाड पडलेल असताना शिवसेनेचा कुठला नेता या मतदारसंघांमध्ये टिकू शकेल याबद्दल मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांची वीस वर्षाची कारकीर्द विकास कामांसाठी फारशी भरीव नाही. मात्र त्यांचा उमेदवारीवर पक्का दावा असू शकतो. अंबादास दानवे यांच्याकडे राज्याचे नेतृत्व आल्याने लोकसभेसाठी उमेदवारी घेतील का याबद्दल शाशंकता आहे. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना पश्चिम मतदार संघातून संजय शिरसाठ यांच्या विरोधात उमेदवारी दिली जाऊ शकते, किंवा संजय शिरसाठ यांच्या विरोधात ऋषिकेश खैरे यांना उभ करून खैरेंच समाधान केल जाऊ शकत. लोकशाही



विकास आघाडी कडून ही जागा शिवसेनेकडून घेऊन ती काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसला दिली जाऊ शकते काय? या पर्यायावरही चाचपणी होऊ शकते. काँग्रेसकडून माजी आमदार सुभाष झांबड, माजी आमदार जिल्हाध्यक्ष कल्याण काळे, जिल्हा बँकेचे संचालक किरण पाटील डोणगावकर यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो. मात्र काँग्रेसची जिल्ह्यातील ताकद पाहता ही लढत तुल्यबळ होऊ शकेल का हा प्रश्न आहे. या ऐवजी हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला दिल्यास पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण हे खासदार इम्तियाज जलील आणि भारतीय जनता पक्षाच्या समोर कडवं आवाहन उभ करू शकतात. भारतीय जनता पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांना शहकाटशहाच्या राजकारणातून केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांना संधी मिळाली मात्र संभाजीनगर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार म्हणून ते कितपत प्रबळ ठरू शकतील, याबाबत शाशंकता आहे. वंचित बहुजन आघाडीच्या पाठिंब्याशिवाय एमआयएम कडून इम्तियाज जलील, भारतीय जनता पक्षाकडून केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड आणि आघाडी कडून आमदार सतीश चव्हाण अशी लढत झाली तर.....

अर्थात निकाल ऐकण्यासाठी आपल्याला 2024 पर्यंत थांबावच लागेल, नाही काय?

ज्ञानेश्वर वाघचौरे
संभाजीनगर
संपर्क : 9960205456

# बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेमधील स्त्री दर्शन



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या सोज्वळ मोहकतेने बंदर मुंबापुरिचें उजळित येई माघामधलीं प्रभात सुंदर' अगदी मुंबई शहराचे वर्णन करायचे झाले तरी तिला गर्भवती स्त्री ची उपमा देण्याचे धाडस आणि कल्पकता बा सी मर्ढेकरांच्या काव्यातून सरळ समोर येते. आता गर्भवती म्हणजे नाविण्याला जन्म देणारी... आणि मुंबई म्हणजे नावीन्य आणि मोहकतेचा परिपाक म्हणून तिचे वर्णन न्हालेल्या गर्भवती ह्या दोन शब्दात करून स्त्री जाणिवेतून शहराचे वर्णन मर्ढेकर सोडून दुसरे कोणीही त्या ताकदीने करणे शक्य नाही.**

करून त्यांनी नव्या जाणिवा जीवनातील उणिवा सर्वसामान्य जगण्यातील दुःख सामान्यांचे शब्द यांचा वापर करून स्वतःचे काव्यलेखन समृद्ध केले नव्हे तर मराठी काव्य सृष्टीला नवकाव्याचे वरदान दिले. नव्या आशयाच्या प्रतिमा, भाषेचा पारंपरिक वापर टाळून तिला अतिशय अर्थसंपन्न करणे ही मर्ढेकरांच्या कवितेतील खास वैशिष्ट्ये, ***बडवीत टिर्या। अर्धपोट किंवा, ओंगळ देखावा। दाखवीत।।***

भिक्षा मागे रोज। एवढासा पोर, आई ती लाचार। पाठीमागे।।

भिक्षा मागणाऱ्या मुलाच्या पाठीमागे फिरणाऱ्या आईची मनःस्थिती दाखवत मर्ढेकरांनी दिसणारे चित्र अधिक भयावह केले आहे. स्वाभिमान टिकला आहे किंवा विकला गेला आहे याचे खरे दर्शन समाजातील स्त्रीच्या स्थानावर अवलंबून आहे. स्त्री समाजव्यवस्थेमध्ये लाचार ठरली की पुढील पिढी भिक्षा मागण्याचे काम करते किंवा तशी वेळ भविष्यातील पिढीवर येते असे सूचक मर्ढेकर यांनी केले आहे. ***आळसली बघ जिवंतता या वृद्धेच्या वदनावर...*** या शब्दांमधून निर्जीवता अधोरेखित करताना जिवंतपणाला आळस आला म्हणजे आता मरणाची वाट सुरु आहे ती भावना तो क्षण तो एका वृद्धच्या चेहऱ्यावर दिसला या ठिकाणीही वृद्ध स्त्री मुळे ती संकल्पना अधिक परिणामकारक होते.

दवात आलीस भल्या पहाटे शुक्राच्या तोऱ्यात एकदा;
जवळून गेलीस पेरीत आपल्या तरल पावला मधली शोभा.

अतिशय तरल आणि भावनाशील कवितेमध्ये सखीचे शोभिवंत वर्णन करताना वरील ओळी मर्ढेकरांनी लिहिल्या आहेत त्यातही तळहाताच्या नाजुक रेषा कुणी वाचाव्या कुणी पुसाव्या; या ओळी मधून स्त्री चे भविष्य शेवटपर्यंत अनाकलनीय असते असेच जणू कवीला सुचवायचे आहे की काय असे वाटते. सौंदर्य आणि निर्मळता त्याच्या अनुषंगाने त्यांच्या कवितेमधील स्त्री वेगवेगळ्या पातळीवर वाचकांना आकर्षित करत राहते. अशातच एखादेवेळी घरकाम करणाऱ्या महिलांचे दुःख मांडण्यासाठी त्यांची कविता पुढाकार घेते चार महिन्यांचा गर्भ गळाल्यावर आठ दिवस तरी आराम करावा लागेल तोवर मालकिणीने दुसऱ्या कुणाला कामावर ठेवू नये व आपले काम आपला रोजगार जाऊ नये म्हणून तिला विनंती करायला येणारी मोलकरीण त्यांच्या कवितेतून भेटते, स्त्रीसुलभ खरे म्हणजे एक स्त्रीच समजू शकते या जाणिवेतून या कवितेचा शेवट फार सकारात्मक आहे,

***घास भरविला बाईने तीज, रजा पगारी दिधली वरती;***
***नभातुनी पण सकाळ संध्या मुखास काळे फासूनी फिरती।।***

मर्ढेकरांची कविता जो वाचतो त्याला स्वतःच्या अनुभवविश्वातून वेगळीच अनुभूती देत राहते तसेच काहीसे त्यांच्या महिलाविषयक कविता वाचताना जाणवते. जिथे मारते कांदेवाडी टांग जराशी ठाकुरद्वारा, या कवितेमधून वृद्ध वेश्येची दिनचर्या वाचकांसमोर मांडताना एक वेगळेच दुःख त्यांनी समोर आणले आहे सकाळ दुपार आणि संध्याकाळ वाट बघण्यात गेले तरी उद्याच्या आशेने नव्हे तर जगण्याच्या आशेने अजूनही कुणाची तरी वाट पाहत बसणे एवढेच तिच्या हाती आहे असे विषण्णपणे ही कविता सांगते. भंगू दे काठिन्य माझे ही मराठीमधील एक महत्त्वाची कविता आहे असे मला नेहमीच वाटते या कवितेतही द्रौपदीचे सत्व माझ्या लाभू दे भाषा-शरीरा या ओळी मधून पाच पांडवांची पत्नी असलेली द्रोपदी आणि त्यातही तिने जपलेले सत्व, याचा उल्लेख स्त्री जातीची उंची व कवितेचा आलेख दोन्हीही एका असीम उंचीवर कवीने नेऊन ठेवले आहेत.

येईल का कधी सीतापति ग, चुकून तरीपण ह्या वाटेला?
घेईल का अन रुजू करून ह्या बोराच्या नैवेद्याला?

रामायणातील शबरी ही संकल्पना वापरून कुठली सीता कुठला राघव? असा भयावह प्रश्न विचारून कवी वाचकाला अंतर्मुख करतात. एकंदरच मर्ढेकरांची कविता मराठी साहित्याला पडलेले भरजरी स्वप्न आहे. त्यातही त्यांच्या कवितेमध्ये स्त्री प्रतिमा गर्भकळेतील सृजनाच्या अविष्करापासून जगण्याच्या आदिम दुःख पर्यंत वाचकाला मोहवित जाते, कधी भयाण वास्तव पाहून अंतर्मुख करते. कधी शब्दात गुरफटून ठेवते तर कधी अतिशय सोप्या आणि साध्या शब्दात व्यक्त होऊन जीवनाची वेगळी परिभाषा करते. मर्ढेकरांच्या कवितेमध्ये स्त्री ही आपल्या आसपास वावरणारी जाणवणारी आणि जगणारी स्त्री आहे त्यामुळेच की सहज वाचकाच्या जवळ जाणारी असते.

बाळगुनि हा पोटी इवला गोळा, हसशी प्रसन्नतेने;
साकारून दे निराकृतीला विरुपता तव तन्मयतेने.

अशा साध्या शब्दातून विश्वाच्या नवनिर्मितीचे बीजे स्त्रीच्या अंतरंगी असून तीच जगाची उद्धारती आहे, सृजनशीलतेची नवी संकल्पना स्त्रीच्या अंगी आहे असे सातत्याने मर्ढेकर आपल्या कवितेमधून सांगताना दिसतात. वेगवेगळ्या टीका, प्रसंगी प्रचंड अहंमन्यता आणि अभिमानी म्हणून ओळखले जाणारे मर्ढेकर मराठी काव्य रसिकांसाठी अनेकदा दुर्बोध होत गेले असे असले तरी त्यांच्या कवितेमध्ये स्त्री, तिचे जीवन, स्त्री पात्रे, प्रतीके प्रतिमा आणि रूपके वाचकांना सहज समजतील जाणवतील आणि मोहवतील असेच होते हे त्यांच्या कविता वाचताना जाणवते. **(काव्यप्रदेशातील स्त्री लेखक किरण डोंगरदिवे, अथर्व प्रकाशन ह्या ग्रंथातून)**

**मागील अंकावरून**

# श्री क्षेत्र गाणगापूर

आधुनिक केसरी

गाणगापूर ग्रामी श्रीदत्तगुरू म्हणजेच प्रत्यक्ष देव आहे. कोटी भाविकांचे श्रद्धा असलेल्या गुरुचरित्र ग्रंथात स्वतः गुरु नृसिंह सरस्वतींनी सांगितले आहे. गाणगापूरचे महात्म्य हजारो वर्षापासून कमी झालेले नाही उलट दिवसेंदिवस ते वाढतच आहे. श्री नृसिंह सरस्वती महाराज येथे आलेल्या भाविकांना गुप्तरुपाने पाहून त्यांना आशीर्वाद देऊन त्यांचे जीवन सुखमय करतात असा अनुभव आहे.

***वास निरंतर गाणगाभुवनासी । भक्तजन तारावयाची राहू तेथे निर्धार***
***आम्ही असतो याचि ग्रामी । नित्यस्नान अमरजा संगमी***
***वसो माध्यान्ही मठाधामी । गुप्तरुपे अवधरा ||***

प्रत्यक्ष देव गाणगापूरात आहेत म्हणून येथे आलेल्या भक्तांना संकटातून तारण्याचे कार्य गेली अनेक वर्ष दत्त महाराज करीत आहेत. येथे देव आहेत व येथेच थांबले आहेत. कोणीही श्रद्धेने या व कृपाशिर्वाद प्राप्त करुन घ्या असा महाराजांचा संदेश आहे. याच गावात राहून दररोजचे स्नान भीमा-अमरजा संगमावर करुन दुपारच्या वेळेस निर्गुण



मठात भिक्षेसाठी गुप्तरुपाने कोणत्याही वेषात उपस्थित असतो असे महाराज सांगतात. अज्ञानामुळे शेजारी असूनसुद्धा श्री गुरुंना आपण ओळखू शकत नाही. नामस्मरणात तल्लीन झाल्यावर व विश्वास ठेवला तर देव दर्शन देतातच अशी भक्तांची श्रद्धा आहे. चराचरात देव वसला आहे अशी चर्चा व समज आहे. परंतू गाणगापूरला प्रत्यक्ष देव आहे. हे सिद्ध गुरुचरित्र ग्रंथातून सांगतात. त्यांच्या कृपेचा साक्षात्कार अज्ञानी भक्त करुन घेत नाहीत. 'नित्य जे जन गायन करिती । त्यावर माझी अतिप्रीती' माझे नामस्मरण करणारे भक्त मला आवडतात हे श्रीगुरुदत्तांनी सांगितले आहे. गाणगापूर येथे दत्त महाराजांचा दिव्य अवतार "श्री नृसिंह सरस्वती" महाराज यांनी २२ ते २३ वर्ष वास्तव्य केले. या संपूर्ण क्षेत्रामध्ये, संगम स्थान (भीमा +अमरजा नदी संगम), निर्गुण पादुका मठ, भस्म महिमा, अष्टतीर्थ महिमा, माधुकरी, संगमेश्वर मंदिर, औदुंबर वृक्ष, विश्रांती कट्टा, निर्गुण पादुका महात्म्य आहे, या दिव्य स्थानाचे दर्शन भाविकांना व्हावे. तसेच कल्लेश्वर येथील दर्शन भाविक घेतात यामुळे गाणगापूर यात्रा पूर्ण झाली असे म्हणतात. कल्लेश्वर हे मुक्तीस्थान आहे असा ऐतिहासिक महिमा आहे. भीमा व अमरजा संगमस्थान – गाणगापूर भीमा व अमरजा या दिव्य पवित्र दोन नद्यांचा संगम गाणगापूर या जागृत शक्ती पीठावर झाला आहे. सदरील संगम निर्गुण मठापासून २ ते ३ किलोमीटर आहे. या संगम स्थानी "भगवान श्री नृसिंह सरस्वती" नित्य स्नान करत असत. **क्रमशः**



# विद्यार्थ्यांचा असाही प्रामाणिकपणा; १० हजारांचा मोबाईल केला परत

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांने केला मोबाईल परत आजच्या स्पर्धेच्या युगात भौतिक सुखाच्या मागे धावताना अनेक जण वाम मार्गाचा अवलंब करून आपल्या गरजा पूर्ण करताना दिसतात . मात्र पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या २ विद्यार्थ्यांनी सापडलेला १० हजार रुपयांचा मोबाईल प्रामाणिकपणे शेतकऱ्याला परत केला. शेतकऱ्याने आनंदित होऊन सदर विद्यार्थ्यांना १०० रुपयांचे बक्षीस दिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पहूर कसबे येथील शेतकरी विठ्ठल पंडित बनकर यांचा अँड्रॉइड मोबाईल दोन दिवसांपूर्वी शाळेच्या परिसरात हरवला होता. शोधा शोध करूनही मोबाईल सापडत नसल्याने त्यांनी आशा सोडली होती. मात्र आज (ता. २९) मंगळवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील रामा ज्ञानेश्वर भिल रा. खर्चाणे इ. ६ वी व संकेत भिमसिंग भिल, रा. खर्चाणे इ ८ वी ( अ ) या विद्यार्थ्यांना शालेय परिसरात मोबाईल सापडला. त्यांनी लगेचच सदर मोबाईल डॉ हेडगेवार प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अजय देशमुख यांच्या स्वाधीन केला . त्यांनी चौकशी केली असता सदर फोन विठ्ठल पंडीत बनकर यांचा असल्याचे निष्पन्न झाले. शाळेत बोलावून मोबाईल त्यांना मोबाईल सुपूर्द करण्यात आला. यावेळी पंडित हरी बनकर यांनी मोबाईल प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल रामा भिल आणि संकेत भिल या विद्यार्थ्यांना १०० रुपयांचे बक्षीस दिले.सापडलेला मोबाईल प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे यांच्यासह सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक होत आहे. असाच प्रामाणिकपणा विद्यार्थ्यांनी जीवनभर जपला पाहिजे, असे आवाहन शंकर भामेरे यांनी केले. हरीभाऊ राऊत यांनी आभार मानले .

# डीपी वीज वितरण कंपनीला वर्ग करा; शेतकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील साठवण तलाव जवळील डिपी महावितरण कंपनीत वर्ग करा अशे निवेदन दि.२८/११/२२ सोमवार रोजी महावितरण कंपनी सिल्लोड येथे निवेदन देण्यात आले.साठवण तलाव जवळील सन 2017/18 मध्ये गोदावरी पाठ वधारे विभाग औरंगाबाद यांनी साठवण तळवाच्या आजूबाजूला चार विदूत ट्रन्स्फोर्मर (डीपी) बसून दिले आहे या ट्रन्स्फोर्मर वरुण शेतकऱ्यांनी रीत सर कनेक्शन घेऊन साठवण तलावातून पाणी उपसा करत आहे परंतु सदरील ट्रन्स्फोर्मर (डीपी) बसून आज रोजी आंदजे पाच वर्ष झालेली आसून आज पर्यन्त है ट्रस्फॉर्मर (डीपी) आपला महावितरण कंपनीकड़े वर्ग केलेले नाही हे जळाला वर सदरील ट्रन्स्फोर्मर (डीपी) हे आपला कंपनी कडून भरून मिळत नाही आपले कर्मचारी सरळ सांगता की याला जा कंपनी नि बसवले आहे किवा ज्या ठेकेदारणी बसवले आहे त्याच्या कडून भरून आणावे ज्या कंपनी ने हे बसवले आहे तीच कंपनी तुम्हाला बसवून देईल अशे उडवाउडवीची उत्तरे शेतकऱ्यांना सांगता की आमची व्हॅलिडिटी संपली आहे तुम्ही है कोना कडे जायाचे तर जाऊ शकता तरी महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी कार्यकारी अभियंता साहेबांनी हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विषया कडे गांभीर्याने लक्ष देऊन सदरील हे ट्रन्स्फोर्मर (डीपी) महा वीज वितरण कंपनी महा. राज्य कडे वर्ग करून घ्यावे जेणे करून शेतकऱ्यांना भविष्यात त्रास होणार नाही अशे निवेदन शेतकऱ्यांनी व प्रभारी सरपंच मो.आरिफ मो.लुखमान सावळदबारा यांनी सिल्लोड येथील कार्यकारी अभियंता विद्दुत महावितरण कंपनी कडे व सावळदबारा येथील ३३ केव्ही महावितरण उपकेंद्रांचे सहाय्यक अभियंता योगेश जाधव यांच्या कडे लेखी निवेदन देण्यात आले आहे.याप्रंसगी शेतकरी दिपक मानकर, सुनील शिप्पलकर, संदीप सुर्यवंशी, शेतकरी व कर्मचारी उपस्थित होते.





# सावरखेडा-लेणापूर शांतता कमिटी बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावरखेडा -लेणापूर येथे सोमवार रोजी शांतता कमेटीची बैठक संपन्न झाली.पोलीस स्टेशन फरदापुर हद्दी मध्येमध्ये आगामी काळात पार पडणाऱ्या ग्रामपंचायत निवडणूक संदर्भाने सावरखेडा-लेनापुर या गावात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याचे पालन व्हावे व ग्रामपंचायत निवडणूक शांततेत पार पडावी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये या पार्श्वभूमीवर स्थानिक शांतता समिती सदस्य यांची मीटिंग घेण्यात आली. शांतता समिती मीटिंग करता सहा. पोलीस निरीक्षक डी.बी. वाघमोडे, पोलीस अंमलदार निलेश लोखंडे, योगेश कोळी, पंकज व्यवहारे, ग्रामपंचायतचे ग्रामसेवक तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, मतदार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शांततेत निवडणूक पार पाडावी अशे आवाहन फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी केले आहे.

# जनजगृती हाच एचआयव्ही एड्सवर प्रभावी उपाय; धोंडीराम राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एके काळी जगात थैमान घालणाऱ्या एच,आय, व्ही,एड्स वर उपाय नव्हता मात्र जागतिक आरोग्य संघटना,व देशातील प्रभावी उपाय व जन जागृती यामुळे या आजारावर नियंत्रण प्राप्त झालेले आहे, मात्र आजही देशात लाखोंच्या संख्येने व जगात ही मोठया प्रमाणात एच ,आय, व्ही,एड्स बाधित आहेत, आणि तेव्हढ्याच प्रमाणात एड्स बाधितांचे मुलं-मुली आहेत, या मुलामुलींचे पुनर्वसन ही फार मोठी जबाबदारी समाजाची,सामाजिक संस्था ब शासनाची आहे,आजही समाजात एच आय व्ही एड्स बाधित आहेत,
एचआयव्ही एड्स बाबत आजही जाणीव जागृतीची गरज आहे, समाजात आजही पाहिजे तशी जागृती नाही, गोरगरीब,वाहनांचे चालक,ट्रक चालक,काही शौकीन यांना या आजाराबाबत परिपुर्ण व सखोल माहिती या आजाराबाबत देणे गरजेचे आहे,ट्रकचालक





हे महिनो महिने बाहेर राहतात, त्यांच्यात या आजाराच्या भयानकतेची माहिती,त्यांच्या शी चर्चा करून, संवाद साधून,त्यांचे समुपदेशन करून जागृती शक्य आहे,देशाच्या ग्रामीण भागात युवा वर्ग मोठ्या संख्येने आहे,यास्तव ग्रामीण भागात ही या बाबत जागृती गरजेची आहे,हा आजार स्पर्शाने, एच,आय,व्ही,बाधित सोबत राहिल्याने होत नाही एड्सवर अद्याप प्रभावी औषध जरी नसले तरी तो होऊ नये यासाठी सावध गिरी हवीच ,बाहेरख्यालीपणा स्त्री व पुरुषांनी टाळावा, दाढी,कटिंग साठी सलुन मध्ये गेल्यावर नवीन ब्लेड वापरण्याबाबत संबधीतास सुचविणे,रुग्णालयात इंजेक्शन घेताना नवीन सुई वापरणे,एड्स बाधित महिला गर्भवती असल्यास पोटातील बाळाला एड्स होतो म्हणून गर्भपात करणे,एड्स ग्रस्तांचे ब्रश,ब्लेड वापरू नये, "मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक",हे सूत्र महिला पुरुषांनी बाळगणे ही काळाची गरज आहे.

# शिक्षक कवयित्री संध्या भोळे रचित 'जावे गुंफित अक्षरे' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** येथील तु. स. झोपे गुरूजी प्राथमिक विद्या मंदिरातील शिक्षिका तथा नवोदित कवयित्री संध्या भोळे रचित 'जावे गुंफित अक्षरे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. खानदेशातील सुप्रसिद्ध साहित्यिक बाबासाहेब के. नारखेडे यांच्या कर्मभूमीत नवोदित कवयित्रीने आपल्या प्रतिभासंपन्नतेचे दर्शन घडवले असल्याचे मान्यवरांनी मनोगतात व्यक्त केले.
पुस्तक प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी खामगाव येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. देवबा पाटील तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अंबरनाथ येथील साहित्यिक सरवाकार प्राचार्य किसन वराडे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी पी. व्ही. पाटील, माजी नगराध्यक्ष प्रमोद नेमाडे, मुख्याध्यापक सुनील वानखेडे, ललितकुमार भोळे व कवयित्री सौ. संध्या भोळे उपस्थित होते.
प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनानंतर नवोदित कवयित्री संध्या भोळे यांनी लेखनामागची भूमिका मांडली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. प्रा. डॉ. जतीन मेढे म्हणाले की, बहिणाबाईंचे काव्य अजरामर झाल्यामुळे अनेक लेकी लिहू लागल्या आहेत. त्यांच्या सकस लेखनाचा परिणाम नवोदित कवयित्री संध्या भोळे यांच्यावरही पडला असून त्यांच्या कवितांमधून हा वारसा जपला गेला आहे. परसाडे जि. प. शाळेच्या शिक्षिका कल्पना माळी यांनी संध्या भोळे यांच्या काव्य प्रवासाविषयी अनुभव व्यक्त करून नानाविध कर्तव्य पार पाडत त्यांनी आपली प्रतिभा जोपासण्याचे कार्य केले असल्याचे सांगितले.
पी. व्ही. पाटील यांनी नवोदित कवयित्रीच्या शब्दरचनेचे कौतुक करून त्यांची काव्यरचना अप्रतिम असल्याचे सांगितले. किन्ही येथील सर्वोदय हायस्कूलचे माजी चेअरमन एकनाथ चौधरी यांनी बाबासाहेब के. नारखेडे यांचा साहित्यिक वारसा नवोदित कवयित्री संध्या भोळे जोपासत असल्याचे सांगून त्यांच्या साहित्यिक वाटचालीला शुभेच्छा दिल्या.
अंबरनाथ येथील प्राचार्य किसन वराडे म्हणाले की, अतिसंवेदनशील असणाऱ्या नवोदित कवयित्री संध्या भोळे यांनी ग्रामीण जीवनाशी बांधिलकी



जपली आहे. ग्रामीण व शहरी भागातील बदलते वास्तवही त्यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे. बहिणाबाईंची लेक म्हणून आत्मभान जागृत करत आपल्या मातीशी प्रामाणिक राहत कवयित्रीने सकस लेखन सुरू केले आहे, ही गोष्ट लेवा गणबोली व एकूणच मराठी भाषेसाठी महत्त्वपूर्ण आहे. माणसातले माणूसपण हरवत चालण्याच्या काळात माणसातल्या चांगुलपणाला आवाहन करत ही कवयित्री शब्दधन पेरत चालली आहे.
अध्यक्षीय मनोगतात प्रा. देवबा पाटील म्हणाले की, शिक्षक म्हणून सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या संध्या भोळे यांनी सामाजिक जाणिवांचे भान राखून दर्जेदार शैलीत अभ्यासपूर्ण काव्यरचना केली आहे. 'जावे गुंफित अक्षरे' हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह सकारात्मक दिशेने वाटचाल करणारा असून त्यातून त्यांची वैचारिक परिपक्वता दिसून आहे. यावेळी उपस्थितांनी संध्या भोळे यांचा सत्कार करून त्यांना साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक सुनील वानखेडे यांनी सर्वांचे शाळेच्या वतीने स्वागत केले. तु. स. झोपे गुरुजी प्राथमिक विद्या मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राहुल भारंबे यांनी केले. कार्यक्रमानंतर सायंकाळी माजी महसूलमंत्री एकनाथराव खडसे, प्रा. डॉ. सुनील नेवे, पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. सुधीर तांबे, प्रा. शैलेश राणे यांनी संध्या भोळे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाचे अभिनंदन करून कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुंबई आग्रा महामार्गावर दरोडा; महिलेसह सहा आरोपींना बेड्या

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शहरालगत मुंबई आग्रा महामार्गावरील वरखेडी उड्डाण पुलावर दरोडा टाकणाऱ्या टोळीला मुद्देमालासह आझाद नगर पोलीस ठाण्यातील पथकाने जेरबंद केल आहे. विशेष म्हणजे या टोळीत एका महिलेचाही सहभाग असल्याचेही दिसून आले आहे.

धुळे शहरातील मुंबई आग्रा हायवे रोडवर वरखेडी उड्डान पुलाचे खाली धुळे कडून शिरपूर कडे सव्हिस रोडने जाणा-या फिर्यादी ताहीर खान रियाजू खान वय २० रा बलखड , ता . कसरावत , जि . खरगोर ( म.प्र ) हा औरंगाबाद येथून आयशर ट्रक क्र . MH - 18 / BH - 2400 ही च्यात औषधी माल भरुन इंदौर येथे जात असतांना उडान पुलाचे खाली १ महिला आरोपी व १० ते ११ पुरुष आरोपी अशांनी एकत्रीत फिर्यादी व त्याचा क्लिनर फरदीन खान फर्याद खान अशांना ट्रकच्या कॅबीन मधून खाली उतरवले व त्यांना चाकू, लोखंडी पाईप , लाकडी दांडक्याचा व मिरची पावडर डोळयात टाकण्याचा धाक दाखवून मारहाण केली दोरीने हात बांधून त्याच्याजवळील रोख रक्कम ८६०० / -रु . व २३,००० / -रु . किंमतीचे मोबाईल हँन्डसेट जबरीने चोरुन नेले. फिर्यादीच्या तक्रारीवरून सदर आरोपी विरुध्द आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला त्या अनुषंगाने पोलिसांनी सापळा रचत या आरोपीतांकडून चाकू, लोखंडी पाईप, लाकडी दांडके व ४ मोटार सायकली असा एकूण १,४१ ,९ ५० / - रु . किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.सदर गुन्हा करतांना पळून जाताना १ महिला व ६ पुरुष आरोपींना शिताफीने पकडून जेरबंद करण्यात आले आहे. सदर आरोपीतांनी यापूर्वी देखील महामार्गावर अशाच प्रकारे केलेले गुन्हे उघडकीस येतील तसेच इतर फरार झालेल्या आरोपीतांचा पोलीस शोध घेत आहेत अशी माहिती ही पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी दिली.

## दोन दुचाकींच्या अपघातात; एक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव जवळ



दोन मोटारसायकल समोरासमोर धडकुन झालेल्या अपघातात एक जण ठार झाल्याची घटना गंगापूर लासूर रोडवरील शिल्लेगाव जवळील मातोश्री ढाब्याजवळ मंगळवारी सायंकाळी आठ वाजेच्या सुमारास घडली आहे. या अपघातात मोटारसायकल वरील दोघा जखमींना उपचारासाठी भरती करण्यात आले आहे. गंगापूरकडे जाणारी मोटारसायकल क्रमांक एम.एच २० एफ.आर ५१९३ वरून चाललेला सद्दाम शेखलाल शेख वय ३४ राहणार अबळनेर असे ठार झालेल्या इसमाचे नाव आहेत तर सोबत असलेला हुजेब गुलजार पठाण वय २० राहणार बोलठाण हा जखमी झाला आहेत.तसेच विरुद्ध दिशेने येणाऱ्या मोटारसायकल क्रमांक एम.पी ११ एम.एक्स ०१९० वरून प्यारासिंग अलावे वय २२ महेबुबखेडा येथील कामगार हा जखमी झाला आहेत दोन्ही जखमींना पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नजीर शेख करीत आहेत.मयत सद्दाम शेखलाल शेख यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले,आई वडील,दोन भाऊ,एक बहीण असा परिवार आहे.

## आयुष्यावर बोलू काही साहित्यिक चर्चासत्र व काव्यमैफल उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** जगद्गुरू तुकोबाराय सेवाश्रम वऱ्हा. ता. मोर्शी. जि. अमरावती द्वारा आयोजित आयुष्यावर बोलू काही या चर्चासत्राचे व काव्यमैफिलीचे आयोजन नामवंत साहित्यिक तथा प्रातिभावंतांच्या उपस्थितीत नुकतेचं अतिशय उत्साहात संपन्न झाले.आयुष्याशी संबंधित विविध पैलूंवर यावेळी समस्त प्रतिभावंतांकडून भाष्य करण्यात आले.व रसिकांना काव्य व गझलांची आगळी वेगळी अनुभूती घेता आली. मोर्शी तालुक्यातील वऱ्हा येथे नुकतेचं दि.27 नोव्हेंबर 2022 रोजी, स्थानिक जगद्गुरू तुकोबाराय सेवाश्रम यांच्यावतीने आयोजक श्री उद्धवजी शहाणे व पंडितजी पंडागळे यांनी "आयुष्यावर बोलू काही" या वैचारिक चर्चासत्राचे व काव्यमैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमाला साहित्यक्षेत्रातील नामवंत व्यक्तींना निमंत्रित करण्यात आले होते.अतिशय सुंदर व दर्जेदार अशा या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव व ख्यातनाम कादंबरीकार शेषरावजी खाडे, तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त सिव्हिल सर्जन तथा लेखक श्री श्यामसुंदर निकम,जेष्ठ वऱ्हाडी कवी आबासाहेब कडू तसेचं कविवर्य विजय सोसे हे मान्यवर उपस्थित होते. आयुष्यावर बोलू काही या शिर्षकांतर्गत अनेक साहित्यिक मान्यवरांनी आपले दमदार विचार मांडले. यामध्ये प्रा.डॉ.उद्धव जाणे, प्रा.राजू शिंदे,यांनी प्रबोधनासह निखळ विनोदातून रसिकांना मंत्रमुग्ध केले.कवी गजानन मते, विजय सोसे यांच्या कवितांनी रसिकांना मोहित केले तर विशाल कन्हेरकर,विशाल मोहोड,गजानन सोनोने यांच्या कवितांनी रसिकांची मने जिंकली,कार्यक्रमाला साहित्यिक श्री प्रदीप चौधरी,लेखक व प्रकाशक संजय महल्ले, प्रा.डॉ.वैभव मस्के यांच्यासह अनेक नामवंत साहित्यिक उपस्थित होते.अतिशय रंगतदार ठरलेल्या या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रृंगारकवी गजानन मते यांनी तर आभार प्रदर्शन उद्धवजी शहाणे यांनी केले.

## बनशेंद्रा येथे शेतकऱ्यांचे दोन लाखांचे शेतीसाहित्य आगीत भस्मसात

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील बनशेंद्रा येथील महिला शेतकरी नंदाबाई वाडेकर यांच्या शेतवस्तीवरील छपराला आग लागून आगीत दोन लाखाचे नुकसान झाल्याची माहिती स्वतः शेतकरी नंदाबाई वाडेकर यानी दिली असून आगीचे कारण मात्र अस्पष्ट असल्याने कळू शकले नाही. बनशेंद्रा येथे नंदाबाई वाडेकर यांचे गट नंबर 41 मध्ये 1 हेक्टर 40 आर जमीन आहे त्यांनी याच शेतीमध्ये खत, धान्य, शेतीसाहित्य ठेवण्यासाठी एक छप्पर या छपरामध्ये त्यांनी ठिबक सिंचन, स्पिन्कलर संच,आठ गोण्या मिश्रखत,विद्राव्य खत,वखर, टिफन, व इतर शेती साहित्य ठेवलेले होते मात्र सोमवारी दि.28 नोव्हेंबरला सकाळी अकरा वाजेच्या सुमारास या छपराला अचानक आग लागली मात्र जवळ कोणी नसल्याने आगीने काही क्षणात रौद्ररूप धारण केल्याने या आगीत मिश्रखतांच्या आठ गोण्या, पिव्हीसी पाईप, ठिबक संच व इतर शेतीसाहित्य व शेतमाल असा एकूण दोन लाखाचा माल आगीत भस्मसात झाल्याने महिला शेतकऱ्यांचे मात्र ऐन बिकटच्या दिवसात मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नंदाबाई गणेश वाडेकर (बाधित शेतकरी)सोमवारी दि.28 नोव्हेंबरला सकाळी अकरा वाजेच्या सुमारास माझ्या शेतातील छपराला अचानक आग लागली मात्र या आगीत शेताला पाणी भरण्यासाठी ठेवलेले पिव्हीसी पाईप,ठिबक सिंचन संच,आठ गोण्या खत,आगीत जळून खाक झाले आहे मात्र प्रशासनाने पंचनामा करण्याव्यतिरिक्त काहीही मदत अद्यापपर्यंत झाली नाही सध्या गहू, कपाशी पिकाला पाणी भरण्याचे दिवस आहे मात्र पाणी भरण्याचं साधने जळून गेल्याने पिकेही विहिरीत पाणी असूनही जळून जाण्याची भीती वाटत आहे तरी किमान पाईप, ठिबक सिंचन संच तात्काळ प्रशासनाने उपलब्ध करून द्यावे अन्यथा पिके पाण्यावाचून वाळून जातील व हातातोंडांशी आलेला घास हिरवला जाईल व पुन्हा एकदा कर्जबाजारी होण्याची भीती वाटते. कल्पना डीघोळे (तलाठी, बनशेंद्रा) काल नंदाबाई वाडेकर यांच्या शेतात लागलेल्या आगीच्या घटनेचा आम्ही पंचनामा केलेला असून ही आग अकस्मित लागल्याने महिला शेतकऱ्याचे बरेच नुकसान झाल्याने पंचनामा करून वरिष्ठ कार्यालयास पाठवण्यात आला आहे मात्र मदत किती व कधी मिळेल ते सांगता येणार नाही असे सांगितले.

## शिवसेनेचे आज चक्काजाम आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने शिवसेना नेते चंद्रकांत खैरे संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या वतीने एकाच दिवशी एकाच वेळी संपूर्ण जिल्हाभर गुरुवार दिनांक १ डिसेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. यात संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात शिऊर बंगला या ठिकाणी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच सहसंपर्कप्रमुख ॲड आसाराम रोठे, महिला आघाडी जिल्हा समन्वयक आनंदीताई अन्नदाते उपजिल्हाप्रमुख अविनाश गलांडे, संजय निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. गंगापूर तालुक्यातील ईसारवाडी फाटा या ठिकाणी विरोधी पक्ष नेता जिल्हाप्रमुख अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण भाऊ सांगळे, अविनाश पाटील, कृष्णा डोणगावकर, अंकुश सुंभ, जिल्हा युवा अधिकारी मच्छिंद्र देवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. कन्नड तालुक्यातील पिशोर नाका या ठिकाणी आमदार उदयसिंह राजपूत, उपजिल्हाप्रमुख अवचित नाना वळवळे महिला आघाडी उपजिल्हा संघटिका हर्षलीताई मुठ्ठे यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. रत्नपुर तालुक्यात भक्तनिवास समोर महिला आघाडी जिल्हा संघटिका प्रतिभा जगताप यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. सिल्लोड तालुक्यात आंबेडकर चौक या ठिकाणी जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, उपजिल्हाप्रमुख सुदर्शन अग्रवाल, जिल्हा युवा अधिकारी कैलास जाधव यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. फुलंब्री तालुक्यात टी पॉइंट या ठिकाणी उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ पवार यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. पैठण तालुक्यात सह्याद्री हॉटेल समोर या ठिकाणी उपजिल्हाप्रमुख अंकुश रंधे, महिला आघाडी जिल्हा संघटिका राखी परदेशी जिल्हा युवा अधिकारी शुभम पिवळ यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात येणार आहे. करमाड येथे उपजिल्हाप्रमुख अशोक शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे.



# ध्येयनिश्चिती केल्याशिवाय यश प्राप्ती होणार नाही : पवार

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ

आधुनिक केसरी न्यूज


**परभणी :** विद्यार्थ्यांची पदवी ही पहिली शिदोरी आहे. या शिदोरीचा उपयोग चांगला केला पाहिजेत. त्याचबरोबर ध्येय निश्चित केल्यास यश प्राप्त होते,असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे नवनिर्वाचित सिनेट सदस्य रामेश्वर पवार यांनी आज येथे केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ आनंद घन यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून सूर्यभान पवार महाविद्यालय तथा नवनिर्वाचित सिनेट सदस्य रामेश्वर पवार, संस्थेचे सचिव कृष्णा भैया शिवाजीराव दळणर, परीक्षा प्रमुख डॉ. उत्तम देवकते, सहाय्यक परीक्षा प्रमुख प्रा. अभय पाटील, ज्ञानोपासक महाविद्यालयाचे आर. बी. क्षीरसागर, डॉ विठ्ठल डुमनर, डॉ. सरवदे, डॉ. नर्सिंगदास बंग, डॉ. तुकाराम बोबडे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, स्वामी रामानंद तीर्थ, व डॉ. शिवाजी दळणर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. पवार म्हणाले,"पदवी मिळाली म्हणजे आपण आयुष्यातील महत्त्वाची कामगिरी पार पाडली असा गैरसमज विद्यार्थ्यांनी करू नये,त्याला अभ्यासच करावा लागतो. पदवी मिळणे हा विद्यार्थ्यांचा पहिला पाया म्हणावा लागेल. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. कोतवाल होण्यासाठी सुद्धा स्पर्धा परीक्षा द्यावी लागते. मानवांची ब्रेन क्षमता सारखीच असते. श्रीमंत झाला म्हणजे त्यांची ब्रेन क्षमता अधिक आहे, असे कारण होऊ शकत नाही. ब्रेन वाढविण्यासाठी वाचन, अभ्यास केला पाहिजे. ज्यांनी वाचन व चिंतन केले त्यांची ब्रेन क्षमता चांगली असते. कुठलीही माहिती वरवरची न घेता ती सखोल आत्मसात केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते 32 विद्यार्थ्यांना पदवी वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. अभय पाटील यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. संतोष हंकारे तर आभार डॉ. तुकाराम बोबडे यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक मोठ्या संख्येने हजर होते.




# अय्युब पठाण यांना बालवाङ्मय पुरस्कार




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मुंबई येथील मराठा मंदिर साहित्य शाखेच्यावतीने २०२० चा बालवाङ्मय पुरस्कार बाल कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना जेष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या हस्ते मुंबई येथे सन्मानपूर्वक पठाण यांना गौरविण्यात आले. अय्युब पठाण यांच्या, " आईचा हात " या बाल कविता संग्रहाला हा मुंबई साहित्य शाखेच्यावतीने मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा हा बालवाङ्मय पुरस्कार ग्रामीण भागातील कवी अय्युब पठाण यांना मिळाल्याने परीसरात त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे. " आईचा हात," ला हा सलग सातवा राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार मिळालेला आहे. दर्जेदार व कसदार आशयघन बाल कविता असलेल्या, " आईचा हात " हा बाल कविता संग्रह असून प्रौढांनासुद्धा या संग्रहातील कविता वाचनीय आहे, असे अय्युब पठाण यांनी सांगितले आहे.

# श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर येथे आनंद नगरी उत्साहात

## चिमुकल्यांच्या खाऊगल्लीने वेधले ग्रामस्थांचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**चापानेर :** बुधवार रोजी श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल चापानेर येथे आनंदनगरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञान मिळावे व त्यांच्यातील व्यावहारिकपणा वाढीस लागावा हा उद्देश ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन हतनूर जी. प. गटाचे जी. प. सदस्य किशोर आबा पवार ,ह .भ. प सुरेश महाराज आढाव ,संस्थेचे अध्यक्ष दशरथ सोमासे सर व उपस्थित मान्यवर पालकांच्या हस्ते फीत कापून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.



आकर्षक सजवलेल्या स्टॉलवर विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भेळ, सँडविच, समोसे, गुलाबजाम, वडापाव, इडली, बासुंदी, नारळा पाणी, लिंबू पाणीसह अनेक स्वादिष्ट पदार्थांचे स्टॉल लावले होते. चापानेर येथील मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले यावेळेस चापानेरचे माजी उपसरपंच काकासाहेब पवार, आबासाहेब पवार, पत्रकार वाल्मीक पवार, संजय हिरे, नारायण राऊत, अभय पवार, प्रशांत पवार यांच्यासह पालक वर्गासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संस्थेच्या सर्व पालक वर्गाने या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना भाग घेण्यासाठी प्रेरित केले व उपस्थित राहून संस्थेत सहकार्य केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली सुषमा दळवी, संदीप वाकडे, वर्षा जाधव, निलोफर शहा, मनीषा पवार, वर्षा बगाग्ड, पूजा सोनवणे, शालिनी पवार, श्रुती नागवंशी, शिक्षकेतर कर्मचारी अंकुश राठोड, राजु राठोड, अजय हिरे, कविता हिरे आदींनी परिश्रम घेतले.

# संविधानिक पदावरील व्यक्तींनी विज्ञानवादी होण्याची गरज

आधुनिक केसरी

**आधुनिक युगाकडे झपाट्याने वाटचाल करणाऱ्या देशात अंधश्रद्धेला बळी पडून सातत्याने घडणाऱ्या अनेक घटना मनाला हेलावून टाकतात. विज्ञानाने सर्व रेकॉर्ड मोडीत काढून मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे.समाज शिक्षित झाला आहे. विज्ञानाने सर्व प्रकारच्या भौतिक सुख सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.मानवाने चंद्रावर पाऊल टाकले तरी आपण अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर पडायला तयार नाही. ही आमच्या समाज व्यवस्थेची शोकांतिका आसुन अंधश्रध्दा हि समाजाला लागलेली किड आहे.**

विज्ञानाने जवळपास सर्वच प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. मात्र आमच्या मानगुटावर बसलेला अंधश्रध्देच भूत उतरायला तयार नाही. श्रध्दा जरुर असावी मात्र अंधश्रद्धा नको.परंतु सर्वच पक्षातील कायदे बनविणारे लोकप्रतिधी संविधानिक पदावर राहुन अंधश्रध्देला खतपाणी घालणारी कित्येक वक्तव्य मिडियासमोर केल्याचे उदाहरण आहेत त्यामुळे अपेक्षा ठेवायची तरी कोणाकडून असा प्रश्न सामान्य नागरीक विचारात आहे.

राजकिय नेते अशी वक्तव्य करतात आणि त्यांचेच अनुकरण खालचे कार्यकर्ते करतात या विषयी जनजागृतीची वेळीच खबरदारी घेण्याची वेळ आलेली आहे. अंधश्रद्धेच्या नावावर एकमेकांना दोष देण्याऐवजी समाजाच्या प्रत्येक घटकाने अशा राजकिय अंधश्रध्देच समुळ उच्चाटन करणे काळाची गरज आहे. पारंपरिक रुढी, प्रथांशी निगडित अंधश्रद्धांचे वैज्ञानिक खंडन करून त्याविरोधात लढणे शक्य आहे. मात्र, सध्या समाजात पसरलेल्या वैचारिक अंधश्रद्धांविरोधात लढणे अधिक आव्हानात्मक आहे. तेव्हा अंधश्रद्धा निमूर्लन समितीने अशा अंधश्रद्धेचे निवारण करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन प्रबोधन समितीचे जिल्हाध्यक्ष शांताराम मगर यांनी केले.


शांताराम मगर

जादूटोणा विरोधी कायदा पारित करणारे शासन राज्यकर्ते आणि राजकीय पक्ष यांच्या विचारांचा आदर्श हा समाज घेत असतो, मात्र आजची राजकीय इच्छाशक्ती ही जादूटोणा, देवाला नवस करणे ,बळी देणे यासारख्या विघातक प्रवृत्तींचा पुरस्कार करण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

संत गाडगे महाराज म्हणतात नवसाने पोरे होती.

तर बायका नवरे न करती . पण 2013 मध्ये जादूटोणा कायदा पारित करणारे आमचे राजकीय विचार इतके कमकुवत झाले आहेत की आम्हाला जनावरांची बळी देणे, रेड्यांचा बळी, बकऱ्यांचा बळी, पशुपक्ष्यांचे बळीचा आधार घ्यावा लागत आहे.बळी देऊन विकासाचं काम करून घेण्याचं पाप पदरात पाडून घ्यावा लागत आहे.आपण इतके कमकुवत झालो आहे. श्रद्धा असावी पण तिचं रूपांतर अंधश्रद्धेत होता कामा नये. शिक्षणात विज्ञानाला महत्त्व देण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करायचा. निधी टाकायचा आणि स्वतः मात्र देवी देवतांना प्रसन्न करण्यासाठी, पुन्हा निवडून येण्यासाठी,पुन्हा मंत्री होण्यासाठी नवस करायचे ...बळी द्यायचे , हे म्हणजे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे यातलाच प्रकार नवीन काय? एकीकडे महागाईने, दुष्काळाने, अतिवृष्टीने आणि नैसर्गिक संकटांनी सर्वसामान्यांचा बळी जात असताना रेड्यांचे आणि पुरुषांचे बळी देऊन भूकबळी झालेले हे राजकीय नेतृत्व देशाला आणि राज्याला कोणत्या विकासाच्याआणि विचारांच्या पातळीवर नेऊन ठेवणार हा सर्वसामान्याला पडलेला प्रश्न आहे. स्वतः जादूटोणाविरोधी कायदा पास करायचा आणि नवस फेडण्यासाठी पशुपक्षी, प्राण्यांचे बळी द्यायचे म्हणजे विधानसभेत गोंधळ आणि नवसात मुजरा असेच आहे. सर्वच राजकीय पक्ष एकमेकावर टिका करतांना जादूटोणाविरुद्ध गोष्टींना खतपाणी घालून आपण विकासात्मक दृष्टिकोनातून लुळेपांगळे झालेलो आहोत हे तर दाखवून देत नाहीत ना?. नवस, जादूटोणा बळी देणे या गोष्टीमुळे जर परिणाम होत असते तर शत्रू बरोबर प्रत्यक्ष मैदानावर उतरून लढाई करण्याची वेळ आली नसती..!

जबाबदार राजकीय पक्ष आणि नेते यांच्या अशा वर्तनामुळे समाजात अंधश्रध्द सारख्या वाईट गोष्टींना खतपाणी घातले जात आहे. मग अशा राजकारण्यांवर जादूटोणाविरोधी कायद्यानुसार कारवाई करणेची अपेक्षा करणे म्हणजे मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. जादुटोणाविरोधी कायदा हा धर्मविरोधी नसुन घटनेत नमुद केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाशी,धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराशी आणि संत, समाजसुधारकांच्या विचारांशी सुसंगत कायदा असल्याचे अंधश्रध्दा निर्मुलन वैज्ञानिक दृष्टिकोन प्रबोधन समितीचे जिल्हाध्यक्ष शांताराम मगर त्यांनी सांगितले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)


डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in